मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २२१ ■ बुधवार, २२ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514







# अतिउष्णतेच्या संकटाचा सामना करण्यासाठी सक्षम उपाययोजना करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्सचा शुभारंभ

**मुंबई :** हवामान बदल या संकटाचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः अल्प भूधारक शेतकऱ्यांना बसत आहे अतिउष्णतेच्या संकटावर उपाययोजना करण्यासाठी तसेच 'उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्स'चा शुभारंभ करण्यात आला असून हे केंद्र भविष्यात राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेचा भाग म्हणून कार्यरत होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे आयआयएम, नागपूर येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हिट रेसिलियन्स अँड सस्टेनेबल कुलिंग'चे उदघाटन केले. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिलचे अध्यक्ष मनीष बापना, एनआरडीसी इंडियाच्या कंट्री डायरेक्टर दीपा सिंग बगई, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉक्टर भालचंद्र चव्हाण, नागपूर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक डॉ. भिमराया मैत्री उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,"विदर्भासह राज्याच्या अनेक भागांत अलीकडे उष्णतेच्या लाटेमुळे शाळा-महाविद्यालये बंद ठेवण्याची वेळ आली होती. हवामान बदल या संकटाचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः छोट्या शेतकऱ्यांना बसत आहे. दुष्काळ, गारपीट आणि वाढते तापमान यामुळे समस्याही गंभीर होत आहेत, यावर तोडगा काढण्यासाठी सेंटर फॉर एक्सलन्स उपयुक्त ठरणार आहे. या संस्थेमार्फत सुरुवातीला प्राधान्याने उष्णलाट कृती आराखडा आणि शहरी हवामान कृती आराखड्यांचा आढावा घेऊन प्राधान्य दिलेल्या शहरांना आणि जिल्ह्यांना तांत्रिक अंमलबजावणीसाठी सहाय्य केले जाईल. उष्णलाट कृती आराखड्यासाठी सक्षम योजना तयार करणे, वार्षिक अंमलबजावणीवर भर देणे. त्यासाठी अधिकारी, आरोग्य कर्मचारी, स्थानिक शहरी नागरिकांसाठी प्रशिक्षण आराखडा तयार करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "शाश्वत विकासासाठी महाराष्ट्र ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होत आहे. २०३० पर्यंत ५२ टक्के ऊर्जा नवीकरणीय स्रोतांमधून, २०३५ पर्यंत ६५ टक्के ऊर्जा अपारंपरिक स्रोतांतून घेण्याचे नियोजन आहे. शेतकऱ्यांना लागणारी १६ हजार मेगावॅट वीज सौर ऊर्जेद्वारे देण्याचा प्रयत्न सुरू आहे. वाढत्या उष्णतेमुळे सर्वत्रच एसी वापर वाढतो त्यामुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी यावर उपाय म्हणून राज्यात प्रभावी 'हीट ॲक्शन प्लॅन'



राबवला जाईल. बांधकाम क्षेत्रात आणि दैनंदिन वापरात स्थानिक व पर्यावरणपूरक उपाययोजनांना प्राधान्य देऊन विकास साधण्यावर भर देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

नागपूरला आंतरराष्ट्रीय महत्व प्राप्त: 'एनआरडीसी'चे अध्यक्ष मनीष बापना

नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिलचे अध्यक्ष मनीष बापना म्हणाले की, स्वच्छ ऊर्जा आणि त्यासोबतच शाश्वत कूलिंग या विषयांवर आपण जे लक्ष केंद्रित करत आहोत, ते आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचे मुद्दे आहेत. येणाऱ्या वर्षांत त्यांचे महत्व अधिकच वाढत जाणार आहे. विज्ञानक्षेत्रात प्रगती होत आहे आणि नवनवीन धोरणेही आखली जात आहेत. जोपर्यंत आपल्याकडे ही धोरणे राबवण्यासाठी सक्षम संस्था नसतील, तोपर्यंत आपण अपेक्षित प्रगती करू शकणार नाही. त्यामुळेच, एक्स्ट्रीम हीट अँड सस्टेनेबल कूलिंग'साठी नागपुरात विशेष 'सेंटर ऑफ एक्सलन्स' हे केंद्र केवळ भारतासाठीच नाही, तर संपूर्ण जगासाठी वैशिष्ट्यपूर्ण योगदान ठरेल. यामुळेच या केंद्राला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले आहे असेही ते म्हणाले.

उष्णतेच्या वाढत्या संकटावर तोडगा काढण्यासाठी आयआयएम नागपूरमध्ये विशेष केंद्र

नागपूरसह विदर्भात उन्हाळ्याची तीव्रता अधिक असते. या समस्येला तोंड देण्यासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) नागपूर आणि अमेरिकेतील 'नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिल' (एनआरडीसी) या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेमध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारानुसार 'आयआयएम' नागपूरमध्ये उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्स' या विषयावर उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यात आले आहे. महाराष्ट्रासह मध्य भारतातील उष्णतेचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन, या केंद्रामार्फत त्यावर उपाय शोधण्याचे काम केले जाणार आहे.

राज्यात "राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था"केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या धर्तीवर मिहान, नागपूर येथे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यासाठी शासनाने रु. १८४ कोटी मंजूर केले आहेत. या इमारतीचे बांधकाम महाप्रित यांच्या माध्यमातून करण्यात येणार असून त्यामध्ये आठ सेंटर फॉर एक्सलन्स असणार आहेत. त्यातील एक केंद्र हे सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हिट रेझिलन्स ॲण्ड सस्टेनेबल कुलिंग हे असणार आहे. यासाठी नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिल न्यूयॉर्क या स्वयंसेवी संस्थेचे तांत्रिक सहकार्य लाभणार आहे.सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हिट रेझिलन्स ॲण्ड सस्टेनेबल कुलींग कामकाज राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था (एसआयडीएम) मिहान, नागपूर येथून चालविण्यात येणार आहे.

**सध्याच्या काळात या केंद्राचे महत्त्व**

नागपूरसारख्या शहरांमध्ये दरवर्षी तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे जाते. वाढत्या उष्णतेचा परिणाम लोकांच्या आरोग्यावर, कामकाजावर, पाण्याच्या उपलब्धतेवर आणि वीज वापरावर होतो. त्यामुळे उष्णतेचा सामना करण्यासाठी योग्य नियोजन आणि उपाययोजना करणे अत्यावश्यक झाले आहे. हे केंद्र उष्णतेचा नागरिकांवर आणि शहरांवर होणारा परिणाम समजून घेऊन, त्यावर सोपे आणि प्रभावी उपाय सुचवेल. विशेष म्हणजे, थंडावा मिळवताना पर्यावरणावर ताण येऊ नये, यावरही भर दिला जाईल. सुरुवातीला हे केंद्र आयआयएम नागपूरच्या परिसरात कार्यरत राहील. येथे संशोधन, प्रशिक्षण आणि धोरणात्मक मार्गदर्शन यावर भर दिला जाईल. राज्य आणि स्थानिक प्रशासनाला उष्णतेसंदर्भात योग्य नियोजन करता यावे, यासाठी मदत केली जाईल. तसेच, शहरांची रचना सुधारणा, ऊर्जा बचतीचे उपाय, आणि परवडणाऱ्या थंडावा तंत्रज्ञानाचा वापर यावर काम केले जाईल. विविध शहरांमधील चांगल्या पद्धतींचा अभ्यास करून त्या इतर ठिकाणी लागू करण्याचा प्रयत्न केला जाईल. एनआरडीसी ही संस्था या केंद्राला तांत्रिक मार्गदर्शन देईल आणि महाराष्ट्र शासनासोबत समन्वय साधून आवश्यक संसाधने उपलब्ध करून देईल.

आयआयएम नागपूर या केंद्राला आवश्यक जागा आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणार आहे. पुढील काळात हे केंद्र नागपूरमध्ये प्रस्तावित असलेल्या महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेत (एसआयडीएम) कायमस्वरूपी हलवण्यात येणार आहे.

---

# तिसऱ्या मुंबई'च्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट?"

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : तिसऱ्या मुंबईसाठी 216 एकर भूसंपादन' या गाजावाजाच्या बातमीमागे शेतकऱ्यांची उघड दिशाभूल आणि फसवणूक लपलेली असल्याचा संतापजनक आरोप पुढे आला आहे. विकासाच्या नावाखाली सुरू असलेल्या या व्यवहारात बिल्डर आणि यंत्रणा एकाच साखळीत गुंतल्याची चर्चा स्थानिक शेतकऱ्यांमध्ये जोर धरत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पेण तालुक्यात काही वर्षांपूर्वी एका बिल्डरने 'स्मार्ट सिटी'चे स्वप्न दाखवत शेकडो एकर जमीन कवडीमोल दरात ताब्यात घेतली होती. आज त्याच जमिनींना सोन्याचा भाव देत सरकार अथवा एमएमआरडीएकडून विकत घेतले जात असल्याचे बोलले जात आहे. शेतकऱ्यांकडून १ ते 1.5 लाख रुपये प्रति गुंठा दराने घेतलेल्या जमिनी आता 25 ते 30 लाख रुपये प्रति गुंठा दराने विकल्या गेल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. म्हणजे घाम गाळणारा शेतकरी कोरडाच, आणि मधल्या दलालांचा कोट्यवधींचा खेळ सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. प्रकरणातील आणखी धक्कादायक बाब म्हणजे, एसईझेड किंवा खाजगी व्यवहारातून विकलेल्या जमिनी एमएमआरडीएच्या नावावर करून "शेतकऱ्यांची संमती मिळाली" असा बनाव उभा करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. कागदोपत्री खेळ करून वास्तव झाकण्याचा हा डाव असल्याचा संशय व्यक्त होत आहे.एसईझेडसाठी संपादित करण्यात आलेल्या पेण व दादर परिसरातील सुमारे एक हजार एकर जमिनींचा या प्रक्रियेत समावेश असल्याचे सांगितले जात आहे. या जमिनींपैकी मोठा भाग सध्या खारफुटीने व्यापलेला असतानाही त्याचा वापर व्यवहारासाठी केला जात असल्याने या संपूर्ण प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.या सर्व पार्श्वभूमीवर स्थानिक शेतकरी आणि नागरिकांमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळत असून, "विकास"च्या नावाखाली सुरू असलेल्या या व्यवहाराची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे. काही बातम्या पेड न्यूजच्या माध्यमातून वातावरण तयार करण्यासाठी पसरवल्या जात असल्याचीही चर्चा असून, नागरिकांनी अशा बातम्यांवर आंधळा विश्वास ठेवू नये, असे आवाहन शेतकरी व त्यांच्या प्रतिनिधी कडून करण्यात येत

---

# दशरथ मुंडे यांची मनसे पनवेल उपतालुका अध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पनवेल तालुक्यातील संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी महत्त्वाची नियुक्ती करण्यात आली आहे. दशरथ ना. मुंडे यांची मनसे पनवेल उपतालुका अध्यक्षपदी अधिकृत निवड करण्यात आली आहे.

नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात त्यांना जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, तालुकाध्यक्ष



सोनवणे यांनी निवडीचे पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी दीपक पाटील, पनवेल तालुका सचिव अल्पेश कडू, निर्दोष गोंधळी उपस्थित होते. दशरथ मुंडे यांच्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवली आहे. या निवडीबद्दल बोलताना मुंडे यांनी पक्षप्रमुख राज ठाकरे आणि वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले असून, तालुक्यातील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि पक्ष संघटना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी मी कटीबद्ध राहीन, असा विश्वास व्यक्त केला.

या निवडीनंतर पनवेल परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मनसे कार्यकर्त्यांनी ही निवड सार्थ असल्याचे सांगत आनंद व्यक्त केला आहे.


---

# पनवेलमध्ये लेन्सकार्टचा निषेध आणि आंदोलनाचा इशाराही

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी)** : लेन्सकार्ट कंपनीच्या काही शाखांमध्ये कार्यरत हिंदू कर्मचाऱ्यांवर त्यांच्या धार्मिक आचरणांबाबत निर्बंध घातले जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नवीन पनवेल युवा मोर्चा, भारतीय जनता पक्षाच्या वतीने कंपनीविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, काही शाखांमध्ये हिंदू कर्मचाऱ्यांना कुंकू, टिळा, गंध लावण्यास तसेच हातावर धार्मिक दोरा धारण करण्यास मनाई करण्यात



येत आहे. याशिवाय, काही ठिकाणी हिंदू सण साजरे करण्यावरही बंधने घालण्यात आल्याचे समोर आले आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असून तो भारताच्या संविधानाने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे. या संदर्भात नवीन पनवेल युवा मोर्चा भाजपाचे अध्यक्ष मयूर कदम यांनी पनवेल येथील लेन्सकार्ट व्यवस्थापनाला लेखी निवेदन दिले आहे. या निवेदनात म्हंटले आहे कि, भारत हा विविध धर्मांचा देश असून प्रत्येक नागरिकाला आपल्या श्रद्धेनुसार व धार्मिक परंपरांनुसार आचरण करण्याचा पूर्ण अधिकार आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही कंपनीकडून विशिष्ट धर्माच्या कर्मचाऱ्यांवर निर्बंध घालणे हे अयोग्य व निषेधार्ह आहे. म्हणूनच, संबंधित प्रकार तात्काळ थांबवून कंपनीने आपली अधिकृत भूमिका स्पष्ट करावी, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत, याची हमी द्यावी. या संदर्भात कंपनीकडून समाधानकारक स्पष्टीकरण न मिळाल्यास नवीन पनवेल युवा मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा लेन्सकार्ट व्यवस्थापनाला देण्यात आला आहे. यावेळी मयूर कदम यांच्या समवेत युवा मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.

---

# डिजिटल अरेस्ट करून 35 लाख 55 हजारांची ऑनलाईन फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : डिजिटल अरेस्ट करून 35 लाख 55 हजारांची ऑनलाईन फसवणूक केल्या प्रकरणी अनोळखी ईसमा विरोधात खारघर पोलीस ठाण्यात 17 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.मालती गर्दे ह्या खारघर, सेक्टर 3 येथे राहत असून त्यांना विशाल याचा मिनिस्टर ऑफ इंडिया मधून बोलत असल्याचे फोन आला आणि कुलाबा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल असल्याचे सांगितले व पोलीस ठाण्यात येण्यास सांगितले मात्र पोलीस ठाण्यात येणे शक्य नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर पुन्हा फोन आला आणि व्हिडिओ कॉल करून समोरची पुरुष व्यक्ती खाकी रंगाच्या ड्रेसमध्ये होती. त्यांनी त्याचे नाव संदीप सांगून मनी लॉन्ड्रीग, अतिरेकी गतीविधी मध्ये त्यांचा सहभाग असल्याचे सांगितले. आणि दर तीन तासांनी दोघा पती-पत्नींना सेफ्टी रिपोर्ट करण्यास सांगितले. यासाठी एका मोबाईलवर वी आर सेफ असा मेसेज पाठवण्यास सांगितले. त्यांनी तसे मेसेज केले. त्यानंतर त्यांनी त्यांच्या पतीला मुंबई पोलिसांचा लोगो असलेली तक्रार, बँकेचे डेबिट कार्ड, स्टेटमेंट, वांटेड यादी, सुप्रीम कोर्टाचे हेडिंग असलेल्या पत्र, ईडीचे पत्र, ईडीची पावती अशी बनावट कागदपत्रे व्हाट्सअपला पाठवली आणि त्यांनी सांगितलेल्या बँक खात्यावर एकूण 35 लाख 55 हजार रुपये पाठवले. पैसे भरल्यानंतर त्यांनी वी आर सेफ हा मेसेज पाठवला नाही आणि समोरील व्यक्तींकडून विचारणा झाली नाही. त्यामुळे त्यांना फडवणूक झाल्याचा संशय आला आणि त्यांनी 1930 नंबर वर संपर्क केला.

# ५०० कोटींच्या योजना ठप्प?

## अमरावती आदिवासी विकास विभाग 'एटीसी'विना चार महिने ठप्प!"

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादिका** : आदिवासी विकास विभागाच्या अमरावती अपर आयुक्त (एटीसी) पदाची नियुक्ती गेल्या चार महिन्यांपासून रखडल्याने संपूर्ण विभागातील कामकाजावर गंभीर परिणाम होत आहे. राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी "लवकरच निर्णय होईल" असे आश्वासन देऊनही पंधरा दिवस उलटले, तरी शासनाकडून नियुक्तीचे आदेश अद्याप जारी झालेले नाहीत.

अमरावती विभागाचा विस्तार तब्बल १२ जिल्ह्यांपर्यंत आहे. एवढ्या मोठ्या कार्यक्षेत्रासाठी पूर्णवेळ अधिकारी नसल्याने योजना अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या नागपूर येथील आयएएस अधिकारी आयुषी सिंह यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार आहे. नागपूर आणि अमरावती अशा दोन मोठ्या विभागांचा कारभार एकाच वेळी सांभाळताना त्यांच्यावर प्रचंड कामाचा ताण पडत असल्याचे चित्र आहे.

१२ जिल्हे, ७ प्रकल्प कार्यालये – यंत्रणा कोलमडली

अमरावती विभागांतर्गत धारणी, अकोला, किनवट, पांढरकवडा, पुसद, कळमनुरी आणि छत्रपती संभाजीनगर येथील सात प्रकल्प कार्यालयांचा समावेश आहे. लाखो आदिवासी विद्यार्थी, आश्रमशाळा, शिष्यवृत्ती, डीबीटी योजना आणि विविध विकास प्रकल्पांचे नियोजन या कार्यालयांमार्फत केले जाते. मात्र प्रमुख पद रिक्त असल्याने निर्णय प्रक्रियेला विलंब होत असून प्रशासकीय यंत्रणा अक्षरशः दमछाक होत आहे.

५०० कोटींच्या बजेटवर परिणाम

या विभागाचे वार्षिक बजेट सुमारे ५०० कोटी रुपये आहे. पूर्णवेळ एटीसी नसल्यामुळे शिक्षण, आश्रमशाळा व्यवस्थापन, थेट लाभ हस्तांतरण (DBT) आणि इतर महत्त्वाच्या योजनांच्या अंमलबजावणीत अडथळे निर्माण झाले आहेत. महत्त्वाच्या फाईल्ससाठी नागपूरकडे पाठपुरावा करावा लागत असल्याने कामांचा वेग मंदावला आहे.

३१ डिसेंबरपासून तात्पुरता कारभार

दि. ३१ डिसेंबर २०२५ पासून आयुषी सिंह यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त प्रभार देण्यात आला होता. साधारणतः १० ते १५ दिवसांत कायमस्वरूपी नियुक्ती होईल, अशी अपेक्षा होती; मात्र चार महिने उलटूनही निर्णय न झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

'नॉन आयएफएस' अधिकारी का मिळत नाही?

अमरावती एटीसी पदासाठी 'नॉन आयएफएस' अधिकाऱ्यांची नियुक्ती अपेक्षित असताना, अद्याप योग्य अधिकारी मिळत नसल्याचे कारण पुढे केले जात आहे. मात्र एवढ्या मोठ्या विभागासाठी अधिकारी न मिळणे हे आश्चर्यकारक असल्याची प्रतिक्रिया विविध स्तरातून व्यक्त होत आहे.

आदिवासी समाजावर परिणाम

प्रशासकीय दिरंगाईचा सर्वाधिक फटका आदिवासी समाजाला बसत आहे. शैक्षणिक सुविधा, आर्थिक मदत, निवास व्यवस्था आणि इतर मूलभूत योजनांच्या अंमलबजावणीत विलंब होत असल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.

एकीकडे शासन "समावेशक विकास"चा नारा देत असताना, दुसरीकडे महत्त्वाचे पद रिक्त ठेवले जाणे ही गंभीर बाब ठरत आहे. आता तरी शासन तातडीने निर्णय घेऊन पूर्णवेळ अपर आयुक्ताची नियुक्ती करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अर्धापूर तालुक्यातील चोरंबा येथे श्री कृष्ण मंदिराच्या मूर्ती प्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे** : करण्यात आले आहे. गावातील नागरिकांच्या सहकार्याने हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.या सोहळ्याची सुरुवात शुभ मुहूर्तावर वेदघोष व मंत्रोच्चारांच्या वातावरणात मूर्ती प्रतिष्ठापनेने होणार आहे. त्यानंतर कीर्तन, भजन, प्रवचन तसेच हरिनाम सप्ताह यांसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले असून मोठ्या संख्येने भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.गावातील तरुण मंडळ, ग्रामस्थ व विविध सामाजिक संस्थांच्या सहभागातून हा सोहळा पार पडत असून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेतला आहे. या धार्मिक कार्यक्रमामुळे चोरंबा गावात भक्तीभावाचे आणि एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले आहे.





## रेवदंडा परिसरात वीज कोसळून ताडझाडाला आग

### मुसळधार पावसाने रिसॉर्ट, वीटभट्ट्या, लग्नमंडपांना भिजवले!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : आज सकाळपासून रेवदंडा आणि आजूबाजूच्या परिसरात प्रचंड विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसाच्या जोरदार सरी कोसळत होत्या. अचानक आलेल्या या पावसाने नागरिकांची धावपळ उडाली. याचवेळी बागमळ्याजवळील पेट्रोल पंपाच्या पाठीमागे असलेल्या उंच ताडझाडावर वीज कोसळली. वीज पडताच झाडाने क्षणार्धात पेट घेतला आणि आकाशात ठिणग्यांचा वर्षाव होत असल्याचे थरारक दृश्य उमटले. मुसळधार पावसातही झाडाची आग काही काळ धगधगत राहिल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले.

घटनास्थळाजवळच CNG आणि पेट्रोल पंप असल्याने संभाव्य धोका लक्षात घेता घबराटीचे वातावरण निर्माण झाले.



सुदैवाने कोणतीही मोठी दुर्घटना घडली नाही. मात्र या घटनेने स्थानिक नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली असा स्थानिकांचा सांगण्याचा भाग आहे.पावसाने रिसॉर्ट, वीटभट्ट्या, लग्नमंडपांना नुकसान

अचानक पावसामुळे रेवदंडा आणि परिसरातील अनेक रिसॉर्टमध्ये लाइटिंग केलेल्या विद्युत सजावटी खराब झाल्या. पावसाचे पाणी जाऊन यंत्रणांना नुकसान झाले, तर रिसॉर्ट मालकांना मोठा फटका बसला. काही ठिकाणी घरांच्या छपराचे कामे सुरू असताना पावसाने वस्तू भिजवल्या आणि नुकसानकारक झाल्या. विशेषत: वीटभट्टीवाल्यांना अतोनात नुकसान झाले. भट्ट्यांमधील लाकड, विटा भिजल्याने व्यवसाय ठप्प झाला असा त्यांचा सांगण्याचा भाग आहे.

काही ठिकाणी लग्नाचे मंडप भिजले, पाहुण्यांची तारांबळ उडाली. अनेक कुटुंबांना लग्नकार्य बाधित झाले. मात्र या सरींमुळे वातावरण तात्पुरते थंडगार झाले असा स्थानिकांचा आनंद व्यक्त करणारा भाग आहे.स्थानिक प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, पुढील हवामान अहवालावर लक्ष ठेवण्याचे सांगितले आहे.

## अद्रक के पंजे 'चे निर्माते बब्बन खान यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**डॉ सुनिल भगत :** 'अद्रक के पंजे'चे निर्माते बब्बन खान यांचे निधन आज हैदराबाद येथे झाले आहे. त्यांच्या निधनाने संपूर्ण हैदराबादवर शोककळा पसरली आहे. गतशतकाच्या अखेरच्या दशकांमध्ये, त्यांच्या रंगमंचीय प्रयोगांनी इतकी प्रचंड लोकप्रियता मिळवली होती की, त्यांची नोंद चक्क 'गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्येही घेतली गेलीहोती.

हैदराबादी विनोदाने नटलेल्या या मालिकेतून एका कनिष्ठ-मध्यमवर्गीय कुटुंबाची हताशा, त्यांची बिकट अवस्था आणि त्यांची मानसिक स्थिती यांचे चित्रण करण्यात आले होते. कुटुंबाचे प्रमुख असलेले 'रामूसू' हे, दैनंदिन जीवनातील कटकटींमुळे सतत हैराण झालेले असत; तसेच आपल्या गरिबीमुळे आणि कुटुंबातील बेबंदपणामुळे ते नेहमीच कर्जाच्या विळख्यात अडकलेले असत. "लहान कुटुंब, सुखी कुटुंब" हा संदेश या मालिकेतून प्रभावीपणे मांडण्यात आला होता.

बब्बन खानने आपल्या वडिलांची आणि कुटुंबाची कहाणी अत्यंत रंजक



शैलीत कथन केली. आठ भावंडांच्या त्या कुटुंबात, बब्बन खान हाच आपल्या आई-वडिलांचा एकमेव हयात राहिलेला अपत्य होता. किंबहुना, वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत त्याला नावही देण्यात आले नव्हते; कारण त्याने जर जीवंत राहून तोवरचा काळ निभावला, तरच त्याचे नामकरण करायचे—असा विचार त्याच्या आई-वडिलांनी केला होता.

बब्बन खान यांनी आपल्या गरीब कुटुंबाची ही उपहासात्मक कथा रात्रभर एका दिव्याच्या खांबाखाली बसून लिहिली. या नाटकाच्या प्रयोगाची व्यवस्था करण्यासाठी त्यांनी आपल्या आईचा एकमेव दागिना विकला. इतकेच नव्हे, तर त्यांनी आपला 'शेरवानी'चा पोशाख शिवून घेण्यासाठी एका शिंप्याला नाटकाची दोन तिकिटे दिली. नाटकाचा पहिला प्रयोग अपयशी ठरला; तरीही, एका रसिकाने रंगमंचामागे जाऊन त्यांना ५०० रुपये दिले आणि हे नाटक सुरूच ठेवण्याचा आग्रह केला. हळूहळू, हैदराबादमधून सुरू झालेल्या या नाटकाने देशभरातील अनेक शहरांचा दौरा केला आणि परदेशातील शहरांमध्येही मोठी खळबळ उडवून दिली. तोपर्यंत, या नाटकाचे १०,००० हून अधिक प्रयोग पूर्ण झाले होते.'स्टँड-अप कॉमेडी'ची लाट येण्यापूर्वीच, बब्बन खान यांनी घरगुती आणि कौटुंबिक विनोदांचा असा काही खजिना सादर केला होता की, तो पाहून प्रेक्षक हसून हसून बेभान होऊन जात असत. बब्बन खान यांच्या प्रतिभेला मानाचा मुजरा!

## विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक डिजीटल नामफलक उभारणी करताना अडथळा करणाऱ्या विरोधात तक्रार

**दैनिक युवक आधार**

**किनवट प्रतिनिधी/विशाल भालेराव** :भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त, १४ एप्रिल रोजी किनवट शहरातील मध्यवर्ती ठिकाणी, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या नावाचा आधुनिक डिजिटल नामफलक युवा उद्योजक आशिष शेळके सरांच्या स्वखर्चातुन उभारण्यात आले. सर्वत्र या उपक्रमाचे कौतुक व प्रशंसा होत आहे. परंतु हे नामफलक उभारणीच्या प्रक्रियेदरम्यान काही व्यक्तींनी जाणीवपूर्वक अडथळे निर्माण करुन सार्वजनिक वातावरण दुषित करण्याचा प्रयत्न केला. अशा अडथळे निर्माण करणाऱ्या व्यक्तीवर तातडीने कारवाई करण्यात यावी अशी तक्रार नगरपरिषद किनवट येथे रिपब्लिकन सेनेतर्फे करण्यात आली आहे.

सविस्तर माहिती अशी आहे की, १३५ व्या भिमजयंती निमित्ताने जयंती



मंडळाचे अध्यक्ष आकाश आळणे व सचिव प्रतिकेश ओंकार आणि समितीचे सर्व पदाधिकारी यांनी आंबेडकर पुतळा परिसर हा आंबेडकर चौक म्हणून ओळखला जातो परंतु अजुन ईथे कुठलेही नामफलक नाही हि बाब समाजाभिमुख प्रतिष्ठित व्यक्तींना, नगरपरिषदेला निदर्शनास आणून दिली पण कुणीही सहकार्य केले नाही शेवटी युवा उद्योजक आशिष शेळके सर यांना ही बाब सांगण्यात आली तेव्हा त्याच क्षणी आशिष शेळके यांनी मी सर्व स्वखर्चातुन डिजीटल नाम फलक उभारेल अशी ग्वाही दिली फक्त ग्वाहीच नाही तर फक्त ८ दिवसांत आकर्षक असा डिजीटल नाम फलक तयार करुन जयंती समितीकडे दिला. परंतु सदर नामफलक उभारणीच्या प्रक्रियेदरम्यान विवेक ओंकार, रा. शिवाजी नगर, किनवट आणि मारोती मुनेश्वर, रा. सिद्धार्थ नगर, किनवट, यांनी जाणीवपूर्वक वाद निर्माण करुन कामात अडथळा निर्माण केला. तसेच "परवानगी घेतली नाही तर फलक उभारु देणार नाही" व "तुमच्यावर कायदेशीर कारवाई करु" अशा प्रकारच्या धमक्या दिल्या. आणि यांना पोलीस प्रशासन व नगर परिषद प्रशासनाने ही सहकार्य केले अशे निदर्शनास आले. या सर्व परिस्थितीत जयंती मंडळाचे अध्यक्ष आकाश आळणे, सचिव प्रतिकेश ओंकार व त्यांच्या सहकाऱ्यांना मोठ्या प्रमाणात व्यय्क्तीक व प्रशासकीय अडचणीला सामोरे जावे लागले. त्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार भिमराव केराम यांच्या मध्यस्थीने प्रशासकीय समन्वय साधून कायदेशीर परवानगी प्राप्त करण्यात आली व अखेरीस हा फलक यशस्वीरीत्या उभारण्यात आला.

परंतु संपूर्ण प्रक्रियेदरम्यान घडलेली ही घटना अत्यंत खेदजनक व निंदनीय असुन सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने घातक आहे. सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित व्यक्ती विवेक ओंकार व मारोती मुनेश्वर यांच्या विरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी. सदरील नामफलकाचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी अशा विविध तक्रारी त्या तक्रार अर्जात नमूद आहेत. आणि या तक्रार अर्जावर राजेंद्र शेळके(मराठवाडा सचिव, रिपब्लिकन सेना), मारोती गायकवाड, लक्ष्मिकांत दराडे, शिवराज मुंडे, भुषण भरणे व विजय मुनेश्वर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या तक्रार अर्जाची तातडीने दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही लवकरात लवकर करण्यात आली नाही तर लोकशाही मार्गाने आंदोलने व निदर्शने करण्यात येतील असे राजेंद्र शेळके यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले.

## रुग्णमित्र जयेंद्र देशपांडे यांची मानवतेची धाव; अस्मिता पाल यांचे यशस्वी ऑपरेशन

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे/लाखनी (प्रतिनिधी)** – तालुक्यातील माडगी/टेकेपार येथील सौ. अस्मिता नरेश पाल यांच्या पोटातील तब्बल १ किलो ६०० ग्रॅम वजनाचा धोकादायक गोळा काढण्यासाठी नुकतीच यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. ही शस्त्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची आणि चिंताजनक परिस्थितीत करण्यात आली.

दरम्यान, ऑपरेशनसाठी आवश्यक असलेल्या रक्ताचा तुटवडा निर्माण झाला होता. अशा कठीण प्रसंगी जनसेवेची भूमिका जपणारे रुग्णमित्र जयेंद्र देशपांडे हे मित्राच्या बहिणीसाठी तत्काळ धावून आले. त्यांनी लाखनी येथील खाजगी रुग्णालयात प्रत्यक्ष भेट देत डॉक्टरांशी सविस्तर चर्चा केली आणि आवश्यक असलेल्या तीन बॅग रक्ताची तातडीने व्यवस्था करून दिली.

देशपांडे यांच्या या तत्परतेमुळे आणि सहकार्यामुळे शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होण्यास मोठी मदत झाली. ऑपरेशननंतर अस्मिता पाल



यांची प्रकृती स्थिर असून त्यांची प्रकृती सुधारत आहे.

दरम्यान, अन्य कामानिमित्त परिसरात आलेल्या जयेंद्र देशपांडे यांनी पाल कुटुंबीयांच्या घरी जाऊन सदिच्छा भेट घेतली व रुग्णाच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी प्रहार दिव्यांग क्रांती संघटना लाखनीचे तालुका अध्यक्ष सुनील कहालकर हेही उपस्थित होते.

जयेंद्र देशपांडे यांच्या या सामाजिक बांधिलकीच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या या मानवतावादी कृतीमुळे समाजात सकारात्मक संदेश पसरत आहे.

## सणसर येथे अल्पसंख्यांक समाजासाठी बैठक व चर्चा

**दैनिक युवक आधार**

**सणसर /विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर येथे बांधकाम कल्याणकारी समितीच्या इंदापूर तालुकाध्यक्षपदी शब्बीरभाई काझी यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून तालुक्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या असणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी कामगार कल्याणकारी समितीचे तालुकाध्यक्ष शब्बीरभाई काझी यांची सदिच्छा भेट घेऊन तालुक्यातील अल्पसंख्याक समाजाच्या समस्या जाणून घेऊन त्यावर चर्चा करण्यात आली समस्यांचे निराकरण करण्यासाठी मार्ग काढण्याची आणि त्यांना सहकार्य



करण्याची हमी या बैठकीत देण्यात आली.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून पुणे जिल्हा अल्पसंख्याक राष्ट्रवादी अध्यक्ष इकबाल भाई शेख, राजूभाई पठाण,असलम भाई शेख,शौकत भाई पठाण,राजू भाई नदाफ,अलीभाई,वसीम भाई आदी मान्यवर उपस्थित होते. या बैठकीत अल्पसंख्यांक समाजाच्या दुःखदायक अडचणींवर मनापासून चर्चा झाली.समाजातील प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळावा,त्यांचे प्रश्न सोडवले जावेत,यासाठी उपस्थित मान्यवरांनी एकत्रितपणे आवाज उठवला जाईल. शब्बीरभाई काझी यांनी दिलेली सहकार्याची हमी समाजातील लोकांच्या मनात आशेचा किरण निर्माण करणारी ठरली.सणसर येथे झालेली ही बैठक केवळ औपचारिकता नसून,अल्पसंख्यांक समाजाच्या जीवनात बदल घडवून आणण्याचा एक भावनिक प्रयत्न होता. उपस्थित मान्यवरांनी दिलेला पाठिंबा आणि सहकार्याची हमी समाजाच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

## सेलू शहरात डासांच्या वाढत्या प्रादुर्भावाने नागरिक त्रस्त; तातडीने फॉगिंगची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** सेलू शहरात गेल्या अनेक दिवसांपासून मच्छर व डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेषतः सायंकाळच्या वेळेस या समस्येची तीव्रता अधिक जाणवत असून नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे.शहरातील विविध भागांमध्ये आणि प्रत्येक वार्डात



डासांची संख्या वाढल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. डासांमुळे ताप, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नागरिकांनी नगरपरिषद आरोग्य विभागाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली असून प्रत्येक वार्डात धूर फवारणी (फॉगिंग) करून डास नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना त्वरित राबवाव्यात, अशी मागणी होत आहे.शहरातील स्वच्छता, साचलेल्या पाण्याची विल्हेवाट आणि नियमित फॉगिंग याकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना कामगारांना भावनिक आव्हान

**दैनिक युवक आधार**

**सणसर – विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या कामगारांची बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली.श्री छत्रपती सह साखर कारखान्याचे चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक व सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखालील बैठकीत कामगार नेते युवराज रणवरे कार्यकारी संचालक अशोक जाधव जनरल मॅनेजर मा.हनुमंत करवर साहेब मा.सागर निंबाळकर यांनी उपस्थित कामगारांना भावनिक आवाहन केले.त्यांनी सांगितले की,बारामती तालुक्यातील मतदार असलेल्या नागरिकांनी स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर सुरु झालेल्या पोटनिवडणुकीत श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांनाच मतदान करावे.कामगार नेत्यांनी आपल्या भाषणात अजितदादा पवार यांच्या कार्याचा उल्लेख करताना सांगितले की,त्यांनी नेहमीच कामगारांच्या हक्कांसाठी लढा दिला आणि सहकारी चळवळीला बळ दिले.त्यांच्या अचानक जाण्याने कामगार वर्गात शोककळा पसरली आहे.या दुःखाच्या क्षणी त्यांच्या पत्नी सुनेत्रावहिनी यांना साथ देणे ही कामगारांची नैतिक जबाबदारी आहे,असे युवराज रणवरे नेत्यांनी स्पष्ट केले.या बैठकीत बारामती तालुक्यातील कामगार



मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या डोळ्यांत अजितदादांच्या आठवणींनी अश्रू तरळले होते.कामगारांनी एकमुखाने सुनेत्रावहिनींना पाठिंबा देण्याचा निर्धार व्यक्त केला. या भावनिक क्षणी सभागृहात एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले.कामगार नेत्यांनी आवाहन करताना सांगितले की,"अजितदादांनी दिलेल्या सहकार्याची आठवण ठेवून आपण सुनेत्रावहिनींना मतदान करून त्यांना बळ द्यावे. हेच आपल्या कामगार वर्गाचे कर्तव्य आहे."या आवाहनाला उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करून प्रतिसाद दिला.या बैठकीतून स्पष्ट झाले की,श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे कामगार वर्ग सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे अश्या प्रकारचे आश्वासन यावेळी कामगार बंधूकडून देण्यात आले त्यांच्या समर्थनाने पोटनिवडणुकीत भावनिक लाट निर्माण झाली असल्याची यावेळी चिन्हे दिसून आली.

# आविष्कार संगीत अकादमी तर्फे भीमजयंती ची भीमसंगीत संध्या

**दैनिक युवक आधार**

**डॉसुनिलभगतप्रतिनिधी**

**नागपूर** : आविष्कार संगीत अकादमी आणि दैनिक बहुजन सौरभ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित सोमवार दिनांक *२०/४/२०२६* ला डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करणार आली. अविष्कार संगीत अकादमी चे गझलगायक अनिल भगत यांनी आपल्या खास शैलीत भीमगीते आणि बुद्ध गीते कार्यक्रमाचे व आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दैनिक बहुजन सौरभ नागपूर चे चे मुख्य संपादक डॉ सिद्धार्थ कांबळे, निवासी संपादक संध्या राजूरकर यांच्या उपस्थितीत बुद्ध वंदने करण्यात आली. सुरवातीला समयोचित डॉ सिद्धार्थ कांबळे, यांचे भाषण झाले. संध्या राजूरकर यांनी




आपले विचार मांडले.त्यानंतर १. सुवर्णा डोंगरे, २. रेखा रंगारी, ३.संध्या साळवे, ४. प्रीती नगरारे, ५.सुकेशनी लोखंडे, १. नीलिमा मून, ७. वंदना सुटे , ८. बापुराव गणवीर , ९. श्रीकांत भेंडे, १०.रत्नदीपा कांबळे, ११. करुणा निकोसे, १२. सुनीता रामटेके, १३. मिनाक्षी शंभरकर , १४. रेखा पोटपोसे, १५. दामोदर लोखंडे , १६. कांचन झोडापे, १७. रत्ना मून, १८. शुभांगी झोडापे, १९. संगीता वहाणे , २०.बी. वाय. सातपुते, २१. रमेश लोखंडे, २२. अन्नपूर्णा दुपटे, २३.अशोक बनकर , २४. डॉ सुनील भगत २५.देवयानी भगत २६. अनिता वानखेडे २७.कहकशा खान , यांनी सुरेल आवाजात भीम आणि बुद्ध गीते सादर केली आणि प्रेक्षकांची मनं जिंकली.गेल्या महिन्याभरात केलेल्या परिश्रमाचा परिपाक म्हणजे सर्वांगसुंदर कार्यक्रम चे नियोजन अतिशय काटेकोर होते. जेवणाची उत्तम व्यवस्था होती. वाद्यवृंद पारंगत होता,. अनिल भगत , सुरेश हिवराळे यांनी महिनाभर परीश्रम घेऊन आपले गीतांची रियाझ करून घेतली.सर्वांना समाधान वाटावे असे सादरीकरण सर्व सदस्यांनी दिले. विशेषतः जे विद्यार्थी नवोदित आहेत त्या सर्वांनी सुंदर गायले. भगत दाम्पत्य, संध्या राजूरकर आणि संध्या साळवे प्रीती नगरारे , सुवर्णा डोंगरे, श्रीकांत भेंडे, रमेश लोखंडे, अनिल भगत यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला. सुकेशिनी लोखंडे यांनी संचालन करताना अतिशय सुरेख भाषेचा वापर, कुठेही वायफळ न बोलता त्यांनी कार्यक्रमाचे वातावरण हसतखेळत ठेवले. सर्व नृत्यांगनांनी कार्यक्रमाला चार चाँद लावले.कार्यक्रमाला उपस्थित असलेले सर्व मान्यवर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती चे सदस्य सुषमा शेवडे, सुमेर शेवडे, उमेश चिट्टे, संदेश हाडके, ज्ञानेश्वर रक्षक, विलास गजभिये यांनी भीम गीत संध्या चे भरभरून कौतुक केले आणि सर्व गायक मंडळी यांचे अभिनंदन केले.कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजन करण्यात आली.

# येत्या दोन दिवसांत निर्णय न झाल्यास उग्र आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : दीर्घकाळ प्रलंबित मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने संतप्त सरकारी-निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आज मंगळवार दि. 21 एप्रिलपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला असून, "आता माघार नाही" अशी ठाम भूमिका घेतली आहे.हा लढा सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समिती, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी तसेच महाराष्ट्र राज्य गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, रायगड जिल्ह्याच्या संयुक्त नेतृत्वाखाली हा लढा उभारण्यात आला आहे.

संघटनांच्या वतीने सरकारला वारंवार वेळ देऊनही कोणतीही ठोस भूमिका घेतली जात नसल्याचा आरोप करण्यात




आला आहे. चर्चेसाठीही पुढाकार न घेणारे सरकार असंवेदनशील असल्याची टीका करत, कर्मचाऱ्यांचा संताप आता उफाळून आला असल्याचे स्पष्ट करण्यात आले. दरम्यान, आजचा इशारा हा केवळ प्रारंभ असून, दोन दिवसांत निर्णय न झाल्यास आंदोलन उग्र स्वरूप धारण करेल, असा स्पष्ट इशारा कामगार नेते संतोष पवार यांनी दिला. "संयमाची मर्यादा संपली आहे; हक्कांसाठी रस्त्यावर उतरावेच लागेल," असे त्यांनी ठणकावून सांगितले.

कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अधिसूचना तात्काळ जारी करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, कंत्राटी व रोजंदारी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त पदे तातडीने भरणे, तसेच सर्व कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे आदी मागण्यांचा समावेश आहे. याशिवाय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवासंबंधी प्रश्नांवर नियमित चर्चासत्र घेण्याची मागणीही करण्यात आली आहे.

चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या भरतीवरील बंदी उठविणे, पदोन्नतीतील अडथळे दूर करणे, अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या देणे, तसेच विविध शासन निर्णयांचा पुनर्विचार करणे, अशा अनेक मागण्या दीर्घकाळ प्रलंबित असल्याचे संघटनांनी नमूद केले आहे. "अभी नहीं तो कभी नहीं" असा नारा देत सर्व कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एकजुटीने संपात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हा लढा केवळ हक्कांसाठी नसून अस्तित्वासाठी असल्याचेही संघटनांच्या नेत्यांनी स्पष्ट केले आहे. या आंदोलनाचे नेतृत्व कार्याध्यक्ष कैलास चौलकर, अध्यक्ष सुरेश पालकर, प्रभाकर नाईक, तसेच सरचिटणीस संतोष पवार आणि इतर पदाधिकारी करत असून, या संपामुळे शासकीय यंत्रणेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# महेश विद्यालय रुई नालकोलचे चार विद्यार्थी पोलीस भरती मध्ये उत्तीर्ण

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी:- मारुती सत्रे** : तालुक्यातील रई नालकोल गावातील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी 1) ऋषिकेश बोडखे पुणे शहर पोलीस,2)महेश नालकोल ठाणे ग्रामीण पोलीस,3) रेणुका औटे पुणे पोलीस4)झुंबर काळे महसूल सहाय्यक मंत्रालय या चारही त्यांचे सत्कार शाळेच्या वतीने करण्यात आले, यावेळी उपस्थित रुई गावचे सरपंच तात्यासाहेब नालकोल,पत्रकार मारुती सत्रे, बाबासाहेब नालकोल,राजू बोडखे,पुणे पोलीस भरत शेळके,अजित पवार उपस्थित होते या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक यु.एस. भुखन यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच आत्तापर्यंत महेश विद्यालयाचे 1000 पेक्षा जास्त विद्यार्थी अनेक पदांवर आपले काम करत आहे एक मोठे यश विद्यालयाच्या वतीने




सांगताना मला आनंद होत आहे प्रा. एस.यू. तोडकर,प्रा.जी.एम.परदेशी,प्रा.डी.जी.शेलार,प्रा. बी.एल,कोकरे,प्रा.एस.डी.एकशिंगे,प्रा.एम.व्ही. बोडखे,हजारे सर,पी.एम.गांजुरे, सतीश वाघुले,ए. डी.धोंडे,पी.एस.नालकोल,बोडखे एम.व्ही.,बोडखे एस.एस.,भारत नालकोल,ए.एस.गांजुरे,अर्चना बोडखे मॅडम,पत्रकार अक्षय विधाते,एस.टी.खिलारे, महेश गायकवाड,टी.ए.मासाळकर,अमोल धोंडे आदी उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी यशाबद्दल अभिनंदन करून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यास शुभेच्छा दिल्या

# रायगड राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक यांची बदली करा ; रायगड वासीयांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** प्रशासकिय कामात दिरंगाई चालढकल पणा लोकप्रतिनिधी व वरीष्ठांच्याच नव्हे तर चक्क मंत्रीमहोदयांच्या आदेशा कडेही कानाडोळा करून फार कामात मग्न



असल्याचा आव आणुन निर्जन्य ठिकाणी सुरू असलेले धोकादायक गावठी दारू अड्यांकडे अधिक्षक मात्र दुर्लक्ष करीत असल्याने रायगड वासीयांत अधिक्षक यांच्या बदलीचा जोर धरू लागला आहे.रायगड जिल्हयात निर्जन व डोंगर जंगल परीसरात छुपे गावठी दारूची निर्मीते केंद्र अधिक्षक यांच्या कृपाशिर्वादाने सुरू असल्याची नागरींकांत चर्चा सुरू आहे अंत्यत निर्जन स्थानी गावठीची निर्मीती करून नंतर ती रायगडच्या विविध भागात रात्रीच्या अंधारात वितरण केली जात असल्याचे स्थानिकांत चर्चा आहे? राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील वाइन शॉप, परमिट रूम यांचे लायसन्स नुतनिकरण 31 मार्च पर्यंत करणे बंधनकारक असल्याचा शासन निर्णय आहे त्या नुसार सबंधीत मालक, चालक आपले लायसन्स लवकरात लवकर नुतनीकरण व्हावे या हेतुने सर्व कागदपत्रे दप्तर तपासणी वेळीच करून स्टेट बॅंकेत चलन भरून आपला व्यवसाय ज्या ठिकाणी आहे तेथील तालुक्याच्या ठिकाणी असलेले राज्य उत्पादन शुल्क तालुका कार्यालयात संपुर्ण नुतनिकरणाचे कामकाज पुर्ण करतात तालुका राज्य उत्पादन शुक्ल अधिकारी अत्यंत कामसु चांगले अधिकारी कर्मचारी असल्याने संबधीत विविध फाईल्स ह्या राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड यांच्याकडे त्या पाठविल्या जातात परंतु नुतनिकरणाकरीता आलेल्या फाईल्स मध्ये काहीतरी क्युरी काढुन संबधीत परमिट रूम वाईन्सशॉप व ईतर व्यावसाईकांना मुख्य साहेबांची सदिच्छा भेट घेतल्याशिवाय त्यांच्या नुतनिकरणाच्या फाईल्स वर साहेब स्वाक्षरी करीतच नाहीत असा आरोप रायगड जिल्ह्यातील चालक मालक खाजगीत बोलत आहेत ?या बाबत वरीष्ठ अधिकारी यांनी या प्रकरणाची दखल घेऊन दोन वर्षे चालु असलेली आमची पिळवणुकीवर थांबवावी व या ठिकाणी एक चांगला कामसु अधिकारी शासनाने नियुक्त करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# सेवानिवृत्तीचा कार्यक्रम न करता शाळेसाठी दिले 74,000 ₹ याचे योगदान : सौ.स्नेहलता हिरामण थोरवे (मिरगणे)

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे** : आष्टी तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या सौ. स्नेहलता हिरामण थोरवे (मिरगणे) या दिनांक 30 एप्रिल 2026 रोजी सेवानिवृत्त होत आहेत. विशेष म्हणजे, त्यांनी पारंपरिक सेवानिवृत्ती समारंभ न करता शाळेच्या विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे.त्यांनी आपल्या सेवेत कार्यरत असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांची वाचनसंस्कृती वाढावी या हेतूने शालेय वाचनालयासाठी एकूण ₹74,000 इतकी रक्कम पुस्तके खरेदीसाठी देणगी म्हणून दिली. यामध्ये प्रा.शा. पालवे/महाडिक वस्ती (₹31,000), जि.प. केंद्रीय प्रा. शा. धामणगाव (₹21,000), प्रा.शा. केरूळ (₹11,000) आणि लोकमान्य टिळक सार्वजनिक वाचनालय धामणगाव (₹11,000) यांचा समावेश आहे.22 एप्रिल 1968 रोजी जन्मलेल्या स्नेहलता थोरवे यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण



क्षेत्रासाठी समर्पित केले. त्यांनी 26 जून 1989 रोजी सहशिक्षिका म्हणून सेवेला सुरुवात केली आणि तब्बल 36 वर्षे 10 महिने 04 दिवस इतका प्रदीर्घ सेवाकाळ पूर्ण केला. त्यांनी बी.ए., एम.ए., बी.एड. शिक्षण पूर्ण करून इंग्रजी विषयाच्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका म्हणून उत्कृष्ट कार्य केले.त्यांच्या कार्यकाळात त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले. शाळेत ई-लर्निंग, आनंददायी शिक्षण, विज्ञान प्रदर्शन, वाचनालय, संगणक कक्ष, वृक्षारोपण, बालमहोत्सव, किशोरी मेळावे, महिला

**सेवानिवृत्ती समारंभ टाळून शाळांसाठी ₹74,000 देणगी**
**7 आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त**
**36 वर्षे 10 महिने सेवा**
**5 शाळांना शैक्षणिक साहित्यासाठी ₹25,000 देणगी**
**इंग्रजी विषयाच्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका**
**सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान**

मेळावे आदी उपक्रम प्रभावीपणे राबवले. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, कौशल्य आणि स्वावलंबन निर्माण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

समाजप्रबोधनाच्या दृष्टीनेही त्यांनी महत्त्वाचे कार्य केले. साक्षरता अभियान, एड्स जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, कुटुंब नियोजन, तसेच मुलींच्या शिक्षणाबाबत जागृती केली. "एक मुलगी शिकली तर संपूर्ण समाज बदलतो" हा संदेश त्यांनी कृतीतून दिला.त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत त्यांना विविध सामाजिक संस्थांकडून 7 आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच त्यांनी शैक्षणिक साहित्यासाठी 5 शाळांना प्रत्येकी ₹5,000 प्रमाणे ₹25,000 देणगी दिली आहे.

त्यांचे पती सुरेश भागवत मिरगणे (सेवानिवृत्त केंद्रप्रमुख) यांनीही त्यांच्या शैक्षणिक प्रवासात मोलाची साथ दिली. त्यांच्या दोन्ही मुलांनीही शासकीय सेवेत उच्च पदावर कार्यरत राहून त्यांच्या संस्कारांचा ठसा उमटवला आहे.

सौ. स्नेहलता थोरवे यांनी आपल्या सेवाकाळात "शाळा, विद्यार्थी आणि वेळ" यांचे काटेकोर पालन करत आदर्श शिक्षकाची भूमिका बजावली. त्यांनी तन, मन आणि धन अर्पण करून शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांना पुढील आयुष्यासाठी आरोग्य, आनंद आणि समृद्धीच्या हार्दिक शुभेच्छा!

# म. ए . सो क्रीडावर्धिनी (मराठी माध्यम), कळंबोली येथे किक बॉक्सिंग चषक 2026 ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल सिटी किकबॉक्सिंग असोसिएशन यांच्या वतीने पनवेल सिटी किकबॉक्सिंग चषक 2026 ही राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धा सेंट अँड्रूयूज इंटरनॅशनल स्कूल, पनवेल येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विविध तालुक्यांतील स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



या प्रतिष्ठित स्पर्धेमध्ये म. ए . सो क्रीडावर्धिनी (मराठी माध्यम), कळंबोली येथील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत खालीलप्रमाणे यश संपादन केले. इयत्ता 6 वी मध्ये शिकणारा ओम कोठावळे - सुवर्णपदक, इयत्ता 5 वी मध्ये शिकणारी अनुष्का गोरड - रौप्यपदक, इयत्ता 4 थी मध्ये शिकणारे, श्री वीरकर - रौप्यपदक, कर्तव्य धनगर - रौप्यपदक, इयत्ता 3 री मध्ये शिकणारी स्वरा कालेल - रौप्यपदक. या सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट स्पर्धा केल्या लवकरच होणाऱ्या राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

म. ए . सो ज्ञानमंदिर, कळंबोली शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संजना बाईत मॅडम यांच्या वतीने सर्व विजेत्या खेळाडूंचे आणि प्रशिक्षक सिद्धेश कदम सर याचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी महाराष्ट्र एजुकेशन सोसायटी, पुणे संस्थेच्या वतीने स्पर्धकांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# पनवेल येथे दुचाकी वाहनांसाठी एम एच 46 डीएच ही नवीन मालिका, पसंतीच्या क्रमांकासाठी अर्ज सादर करावेत

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे दुचाकी वाहनांसाठी एम एच 46 डीएच ही नवीन मालिका सुरु करण्यात येणार आहे. यासाठी ज्यांना दुचाकी वाहनांकरिता आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरुन हवे असतील त्यांनी 23 एप्रिल 2026 रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी 10 ते दुपारी 2.30 या दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या खाजगी वाहन विभागात डीडी, निवासी पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिहवन अधिकारी पनवेल यांनी केले आहे.एकाच नंबरकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी 23 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी 4 वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. त्यानुसार एकाच नंबरसाठी एकापेक्षा जास्त अर्ज असतील तर त्या अर्जदारांनी त्याची नोंद घेऊन 24 एप्रिल 2026 रोजी कार्यालयीन वेळेत दुपारी 2.30 वाजेपूर्वी त्यांच्या इच्छेप्रमाणे जास्तीच्या रक्कमेचा धनाकर्ष (DD) बंद लिफाफ्यामध्ये कार्यालयात जमा करावा. या अर्जासाठी त्याच दिवशी दुपारी 3.30 वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवीन वाहन नोंदणी विभाग यांच्या दालनात लिलाव करण्यात येईल.

# खतांचा काळा बाजार, साठे बाजी करणाऱ्या विरुद्ध धडक कारवाई

### 183 खत विक्री केंद्रांना नोटीस 43 खते विक्री केंद्राचे परवाने निलंबित 2 विक्री केंद्रांवर गुन्हे दाखल

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : विभागात खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना कृषी निविष्ठा व खतांचा पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी विभागात कृषी विभागातर्फे धडक मोहीम राबविण्यात येत आहे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना बियाणे व खतांची कमतरता भासणार नाही, याबाबत कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.

विभागातील सहा जिल्ह्यांसाठी या खरीप हंगामामध्ये 19.53 लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. या हंगामासाठी शासनाकडून 7.100 लाख मॅट्रिक टन खत पुरवठा मंजूर झाला आहे, त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या खतांची तसेच बियाण्यांची कमतरता भासणार नाही.

**183 खत विक्री केंद्रांना नोटीस**

विभागात खतांचा तसेच कृषी निविष्ठांचा काळाबाजार साठेबाजी थांबवण्यासाठी कृषी विभागातर्फे विशेष मोहीम राबविण्यात आली आहे, या मोहिमेअंतर्गत विभागात 183 खतविक्री केंद्रांना नोटीस बजावण्यात आली आहे. त्यासोबत 43 खत विकी केंद्रांचे परवाने निलंबित केले असून दोन विक्री केंद्रांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. अनावश्यक खतांचा साठा तसेच साठेबाजी करणाऱ्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती कृषी सहसंचालक उमेश घाडगे यांनी दिली.

खरीप हंगामासाठी शेतकरी बांधवांनी गरजेपुरतीच खते व बियाणे खरेदी करावी कुठल्याही परिस्थितीत अतिरिक्त साठा करू नये तसेच खतांची नियोजन करत असताना केवळ युरिया व डीएपी खतावरच अवलंबून राहता इतर पर्यायी व संयुक्त खताचा वापर करावा असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे खत विक्रेत्या केंद्रांनी खतांची विक्री केवळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना करावी व विक्री करताना मशीनद्वारे विक्री करावी तसेच शिल्लक खत प्रत्यक्ष साठा त्याची नोंदवही ठेवावी असे आव्हानही विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाडगे यांनी केले आहे.

# राष्ट्रनिर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अनमोल — उत्तम कांबळे

## सेलूतील स्मृती व्याख्यानमालेस उत्स्फूर्त प्रतिसाद; सामान्यज्ञान स्पर्धेत विद्यार्थ्यांचा गौरव

**दैनिक युवक युवक**

**सेलू (प्रतिनिधी) शिवाजी पवार** : लोकशाहीचा खरा पाया सामान्य नागरिक असून तिच्या सुदृढ भविष्यासाठी जनतेमध्ये जागरूकता व गुणवत्ता आवश्यक आहे. मतदानाचा अधिकार हा नागरिकांच्या स्वाभिमानाचा गाभा असून तो विकणे म्हणजे आत्मसन्मान गमावणे होय, असे विचार प्रसिद्ध साहित्यिक उत्तम कांबळे (नाशिक) यांनी व्यक्त केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे महत्त्व त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने साई नाट्यगृह, सेलू येथे आयोजित स्मृती व्याख्यानमाला मोठ्या उत्साहात पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण



होते. पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी दिपककुमार वाघमारे, तहसीलदार डॉ. शिवाजीराव मगर, पोलिस निरीक्षक दिपक बोरसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

उत्तम कांबळे यांनी आपल्या भाषणात भारतीय संविधानाच्या निर्मितीमागील संघर्ष अधोरेखित करताना सांगितले की, संविधान हा केवळ दस्तऐवज नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. सर्वसामान्य माणूस हा त्याचा केंद्रबिंदू असून, संविधानामुळे वंचितांना न्याय मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे. संघर्षातूनच परिवर्तन घडते आणि याच संघर्षातून नव्या समाजाची उभारणी होते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय डॉ. काशिनाथ पल्लेवाड यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. सुरेश हिवाळे यांनी केले आणि आभार प्रदर्शन माधव गव्हाणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**सामान्यज्ञान स्पर्धेत विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित तालुकास्तरीय सामान्यज्ञान स्पर्धेत विविध गटांतील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.


पाचवी ते सातवी गटात आराध्या सावंत प्रथम, सांची भालेराव द्वितीय, रायबा भोसले तृतीय; आठवी ते दहावी गटात सृष्टी कदम प्रथम, समृद्धी बुरेवार द्वितीय, प्रतिक्षा चिंचोलीकर तृतीय; तर अकरावी ते पदव्युत्तर गटात प्रियंका डंबाळे प्रथम, श्याम बोरकर द्वितीय आणि गायत्री पवार तृतीय ठरले.

विजेत्या विद्यार्थ्यांचा रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि संविधानाची प्रत देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# उपजिल्हा रुग्णालय दर्यापूर येथे खासदार बळवंतराव वानखडे यांची भेट

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : दर्यापूर, 21 एप्रिल 2026 वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात खासदार बळवंतराव वानखडे यांनी सोमवारी अचानक भेट देऊन रुग्णालयातील व्यवस्थेचा आढावा घेतला. विशेषतः उष्माघातग्रस्त रुग्णांसाठी नव्याने सुरू करण्यात आलेल्या विशेष कक्षाची त्यांनी पाहणी केली व रुग्णांशी संवाद साधला. खासदार वानखडे यांनी जनरल वॉर्डमध्ये जाऊन उपचार घेणाऱ्या रुग्णांची प्रत्यक्ष भेट घेतली. उष्माघात कक्षात पुरेसा औषधसाठा, वातानुकूलित कूलरची व्यवस्था आणि आवश्यक सुविधा असल्याची खातरजमा केली. आतापर्यंत अनेक किरकोळ उष्माघाताचे रुग्ण उपचार घेऊन पूर्णपणे बरे होऊन



घरी परतले असल्याची माहिती यावेळी वैद्यकीय अधिक्षक डॉ. डाबेराव यांनी दिली.

**उष्माघातापासून बचावासाठी आवाहन**

अमरावती-अकोला परिसरात तापमान सरासरीपेक्षा जास्त नोंदवले जात असल्याने खासदार वानखडे यांनी नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले. लहान मुलांची काळजी कशी घ्यावी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

**डॉ. डाबेराव यांनी दिलेल्या सूचना:**

पाणी प्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ देऊ नये. दिवसभर पुरेसे पाणी, नारळ पाणी, लिंबू सरबत घ्यावे.उन्हात जाणे टाळा विशेषतः दुपारी 12 ते 4 या वेळेत उन्हात जाणे टाळावे. बाहेर पडताना डोक्यावर रुमाल किंवा कॅपचा वापर करा पांढरे, सुती व सैल कपडे परिधान करावेत.टाळा चहा, कॉफी, मद्यपान यामुळे शरीरातील पाणी कमी होते.लक्षणे दिसल्यास चक्कर, मळमळ किंवा भोवळ आल्यास तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचार घ्यावेत.

**यावेळी उपस्थित मान्यवर**

या प्रसंगी दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख गोपाल पाटील, मनसेचे तालुकाप्रमुख मनोज पाटील, सामाजिक कार्यकर्ते संदीप पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी व रुग्णालयीन कर्मचारी उपस्थित होते.दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयाने उष्माघातासाठी केलेली पूर्वतयारी समाधानकारक असल्याचे मत खासदार वानखडे यांनी व्यक्त केले व वैद्यकीय पथकाचे कौतुक केले.

# नाशिक येथे परीट समाजाच्या उच्चशिक्षित वधू-वरांचा मेळावा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : महाराष्ट्र परिद/धोशी सेवा मंडळ व परीट समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे प्रथमच उच्चशिक्षित वधू-वरांसाठी "इलाईट स्नेहभेट" या विशेष वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा रविवार, २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हॉटेल कालिटी इन, विजय-ममता थिएटर शेजारी, पुणे रोड, नाशिक येथे पार पडणार आहे.

पारंपरिक मूल्ये आणि आधुनिकतेचा समन्वय साधणाऱ्या या उपक्रमामध्ये परीट समाजातील उच्चशिक्षित युवक-युवतींना एकमेकांना ओळख करून देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. समाजातील जास्तीत जास्त बांधवांनी या मेळाव्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या मेळाव्यासाठी एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., बी.ई., एम.ई., एम.एस., एम.टेक., एम.सी.ए., एम.सी.एम., सी.ए., एम.फार्म, सर्व डॉक्टर्स, एलएलबी, एलएलएम, एमबीए, पीएच. डी. धारक विद्यार्थ्यांना सहभागासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. तसेच पालकांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे.

सहभागींनी येताना दोन पासपोर्ट साईज फोटो आणणे आवश्यक असून कार्यक्रमादरम्यान प्रत्यक्ष फॉर्म भरून संपूर्ण माहिती असलेला बायोडाटा जमा करणे बंधनकारक राहणार आहे. कार्यक्रमाचा मुख्य भर वधू-वर व त्यांच्या पालकांच्या प्रत्यक्ष परिचयावर असणार असून संपूर्ण कार्यक्रम नियोजित वेळेनुसार पार पाडण्यात येणार आहे.

या मेळाव्यासाठी इच्छुकांनी दि. २२ एप्रिलपर्यंत आपला प्रवेश निश्चित करावा. अधिक माहितीसाठी विजय शिरसाट (९४२२२ ५९१६५), कैलास देवरे (९४२१५०९४२९) आणि संतोष निकम (७७६८८८२०००) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# बोरी गावचा सुपुत्र सुजित ठोंबरे ;राज्यात १६वी रँकसह सहायक नगर रचनाकारपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**सणसर : - विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील बोरी गावचा सुपुत्र श्री. सुजित सुवर्णा महावीर ठोंबरे (बी.ई. आर्किटेक्चर) यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत सहायक नगर रचनाकार (राजपत्रित सेवा, गट ब, श्रेणी-१) या पदावर निवड मिळवली आहे. विशेष म्हणजे त्यांनी संपूर्ण राज्यातून १६ वी रँक प्राप्त करत हे यश संपादन केले असून, त्यांच्या या कामगिरीमुळे बोरी गावासह इंदापूर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.सुजित ठोंबरे हे कै. उत्तम दगडू ठोंबरे यांचे नातू तसेच सौ. सुवर्णा व महावीर ठोंबरे यांचे चिरंजीव आहेत. आई



सौ. सुवर्णा ठोंबरे या सणसर येथील प्राथमिक शाळेत शिक्षिका आहेत, तर वडील महावीर ठोंबरे हे संजयनगर येथे प्राथमिक शिक्षक म्हणून सेवा बजावत आहेत. शिक्षणाचा दृढ पाया लाभलेल्या कुटुंबातून आलेल्या सुजित यांनी लहानपणापासूनच अभ्यासात सातत्य, मेहनत आणि शिस्त जोपासली.शैक्षणिक प्रवास विद्या प्रतिष्ठान चे विनोदकुमार गुजर इंग्लिश मीडियम स्कूल, बारामती उच्च माध्यमिक टी. सी.कॉलेज,बारामती पद्मभूषण वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर पुणे सुजित यांनी आर्किटेक्चर परिषद (Council of Architecture) चे माजी अध्यक्ष आर्किटेक्ट प्रेमेंद्र राज मेहता तसेच भारतीय वास्तुविशारद संस्था (Indian Institute of Architects) चे माजी अध्यक्ष आर्किटेक्ट ब्रह्मदेव दहिया, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली प्रॅक्टिस करून व्यावहारिक अनुभव मिळवला. त्यांच्या पत्नी दंत चिकित्सक असून, कुटुंबाकडून मिळालेला पाठिंबा आणि प्रोत्साहन हे त्यांच्या यशामागील महत्त्वाचे घटक ठरले आहेत.सहायक नगर रचनाकार हे पद शहर व ग्रामीण भागातील नियोजनबद्ध विकास, बांधकाम नियमांची अंमलबजावणी आणि सुयोग्य नगररचना घडविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे सुजित यांच्या निवडीमुळे प्रशासनात सक्षम, तांत्रिकदृष्ट्या पारंगत आणि प्रामाणिक अधिकारी मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.सुजित ठोंबरे यांच्या या यशाबद्दल ठोंबरे परिवारावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, गावातील मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील व्यक्तींनी त्यांचे कौतुक केले आहे. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला असून, स्पर्धा परीक्षांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन वाढीस लागणार आहे.

# प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभरातील कर्मचारी बेमुदत संपावर ; श्रीवर्धनमध्येही कामबंदचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित** : दि. २१ एप्रिल शासनाकडून वारंवार पाठपुरावा करूनही आपल्या प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत राज्यातील सरकारी व निमसरकारी कर्मचारी अखेर आक्रमक झाले आहेत. 'महाराष्ट्र राज्य सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकतर कर्मचारी समन्वय समिती'च्या नेतृत्वाखाली आजपासून बेमुदत संपाला सुरुवात करण्यात आली असून, या संपामुळे राज्याच्या प्रशासकीय कामकाजावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून विविध मागण्यांसाठी कर्मचारी संघटनांकडून शासनाशी संवाद साधण्याचा प्रयत्न सुरू होता. मात्र, तब्बल १५ महिन्यांच्या कालावधीत मुख्यमंत्र्यांशी भेटीसाठी सात वेळा प्रयत्न करूनही वेळ न मिळाल्याची खंत समितीने व्यक्त केली आहे. याशिवाय, विधानसभा पटलावर मान्य झालेल्या काही मागण्यांचीही अंमलबजावणी न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये जुनी पेन्शन योजना लागू करणे हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्ती झालेल्या विना अनुदानित व अंशत: अनुदानित संस्थांतील कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देण्याची मागणी करण्यात येत आहे. त्याचबरोबर, गेली अनेक वर्षे कंत्राटी किंवा रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याची मागणीही ठामपणे मांडली जात आहे. सर्व कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणारी व्यापक योजना लागू करणे, विविध विभागांतील रिक्त पदे तातडीने भरून पदोन्नतीतील अडथळे दूर करणे, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची भरती, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्या आणि नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा फेरविचार अशा अनेक मागण्या या संपामागे आहेत.

समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी ही लढाई कर्मचाऱ्यांच्या अस्तित्वाशी निगडित असल्याचे स्पष्ट करत, "आता नाही तर कधीच नाही" या भूमिकेतून सर्वांनी एकजुटीने संपात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. त्यांच्या या भूमिकेला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

दरम्यान, कोकणातील श्रीवर्धन येथेही या संपाचे पडसाद उमटले असून, स्थानिक सरकारी कर्मचाऱ्यांनी संपाला पाठिंबा जाहीर करत कामबंदची हाक दिली आहे. त्यामुळे येथील शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था आणि विविध सेवा यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.एकूणच, कर्मचाऱ्यांचा हा बेमुदत संप किती काळ चालणार आणि शासन यावर काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# चोरी करण्याचा प्रयत्न, गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल /वार्ताहर** : घराचा लॉक उघडून चोरी करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात 16 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.अपूर्वा गुडेवार या सेक्टर 17, वास्तू विहार रोड, खारघर येथे राहत असून त्यांनी त्यांच्या वॉचमनला घराची चावी देऊन त्या पुण्याला गेल्या होत्या. 14 एप्रिल रोजी त्या परत आल्या. त्यावेळी त्यांनी वॉचमनकडील चावी घेतली आणि घरात प्रवेश केला यावेळी कपाटाचा दरवाजा उघडा दिसला आणि सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. बेडरूम मधील कपाट उघडा होता आणि किचन मधील सामान देखील अस्ताव्यस्त पडले होते. घरातील सामानाची पाहणी केली मात्र सामानाची चोरी झाल्याचे आढळून आले नाही. सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता वॉचमनचा मित्र रोशन याने टी-शर्ट ने तोंड झाकून सीसीटीव्हीचा स्विच ऑफ केलेला दिसून आले. यावरून वॉचमेनने त्यांच्या घरात चोरी करण्याचा प्रयत्न केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला.

# स्टंटबाजी करणाऱ्या तरुणाला हटकले असता केली मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : स्टंटबाजी करणाऱ्या तरुणाला हटकले असता त्याने आणि इतर दोन अनोळखी इस्मानी 31 वर्षीय तरुणाला मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी तिघां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 18 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. नील भरत पुजारा हा एमजी रोड, पनवेल येथे राहत असून तो 15 एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास जेष्ठ नागरिक हॉल येथील चहाच्या टपरीवर चहा पिऊन स्कुटी वरून घरी जात होता. दर्ग्याजवळ आला असता स्कुटी वरील अनोळखी चालकाने स्टंटबाजी केली. यावेळी अरे तू उडवशील असे बोलला त्यानंतर हा रायडर लोकांचा इलाका आहे इथे असेच होतं असे बोलून त्याने हुज्जत घातली आणि त्या ठिकाणी उभे असलेल्या त्याच्या साथीदारांनी नील याला ठोशाबुक्क्याने मारहाण केली. त्याच्या डोळ्यातून रक्त येऊ लागले. त्याला चक्कर आल्याने तो खाली बसला. त्याला लक्ष्मी आय केअर पनवेल येथे उपचारासाठी दाखल केले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# वनमंत्री गणेश नाईकांच्या ठाम विरोधामुळे नवी मुंबई एमआयडीसीची वादग्रस्त एसआरए निविदा रद्द

## २१० एकर जमिनी बिल्डरांच्या घशात घालण्याचा डाव उधळला

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** नवी मुंबईतील एमआयडीसी क्षेत्रातील झोपडपट्ट्यांच्या एसआरए (Slum Rehabilitation Authority) योजनेअंतर्गत काढलेली वादग्रस्त निविदा अखेर रद्द झाली. वनमंत्री गणेश नाईक यांच्या प्रखर विरोधामुळे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या सतत पाठपुराव्याने राज्य शासनाने हा निर्णय घेतला. या निविदा प्रक्रियेमुळे ३३० एकर जमिनीपैकी १२० एकरवर पुनर्वसन होऊन उरलेली २१० एकर जमीन बिल्डरांच्या ताब्यात जाणार होती, असा गंभीर आरोप माजी महापौर सुधाकर सोनावणे यांनी केला आहे. सोमवारी (२० एप्रिल २०२६) झालेल्या नवी मुंबई महानगरपालिकाच्या महासभेत सत्ताधारी-विरोधी सर्वच पक्षांनी राज्य शासनाचे अभिनंदन करणारा ठराव jedया एकमताने मंजूर केला.

***प्रकरणाची पार्श्वभूमी: घाईघाईची निविदा प्रक्रिया आणि जनमताची अवहेलना***




नवी मुंबई एमआयडीसी क्षेत्रात ८८ झोपडपट्ट्या असून, त्यांचा विकास करण्यासाठी एमआयडीसीने पुढाकार घेतला होता. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या पहिल्या आदेशात 'जनमतसंहितेचा विचार न करता' पुनर्विकास करावा, असा धक्कादायक उल्लेख होता. त्यानंतर २५ मार्च २०२६ रोजी दुसरा जीआर (Government Resolution) काढून अवघ्या २४ तासांत २७ मार्च रोजी निविदा प्रक्रिया राबवली गेली. ही घाईगाठ कशी शक्य?, असा प्रश्न लोकप्रतिनिधींनी उपस्थित केला. टीटीसी (Thane-Belapur Complex) मधील ३८,८०० झोपडपट्टीधारकांच्या हक्कांचा विचार न करता बिल्डरांना फायदा पोहोचवण्याचा हा डाव होता का?, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

*महासभेत आरोप-प्रत्यारोपांची फैरी: सोनावणेंचा एमआयडीसीवर हल्लाबोल*

महासभेत माजी महापौर सुधाकर सोनावणे यांनी ठराव मांडताना एमआयडीसीच्या कारभारावर कडाक्याच्या टीका केली. "एमआयडीसी क्षेत्रातील ३३० एकर जमिनीपैकी १२० एकरवर पुनर्वसन करून उरलेली २१० एकर जागा कोणाच्या घशात घालायची होती? हे बिल्डरांना शहरात घुसवण्याचा खतरनाक डाव होता," असा त्यांनी थेट आरोप केला. सभागृह नेते सागर नाईक म्हणाले, "इतक्या कमी वेळेत निविदा कशी निघाली? शहरातील कुटुंब वाढल्याने अनेकांना घराचा लाभ मिळाला नसता. मंत्री गणेश नाईक यांनी तात्काळ मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन हा अन्यायकारक निर्णय रद्द करण्यास भाग पाडला."

*आता क्लस्टर विकास योजना: भूमिपुत्रांना न्याय मिळणार*

निविदा रद्द झाल्याने आता एमआयडीसी क्षेत्राचा विकास नवी मुंबई महापालिकाच्या नियोजनाखाली क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेअंतर्गत होणार आहे. यामुळे झोपडपट्टीधारक आणि भूमिपुत्रांना अधिक पारदर्शक आणि न्याय्य पद्धतीने फायदा होईल, असा विश्वास सागर नाईक यांनी व्यक्त केला. महापौर सुजाता पाटील यांनी मंत्रालयातील बैठकीत स्वतः उपस्थित असल्याचे सांगितले आणि मुख्यमंत्र्यांनी निविदा रद्द केल्याची पुष्टी केली.

*सर्वपक्षीय समर्थन: गणेश नाईकांची भूमिका प्रशंसनीय*

महासभेत भाजपचे सुरज पाटील, अमित मेढकर, शशिकांत भोईर, अपर्णा गवते; शिवसेनाचे द्वारकानाथ भोईर, शिवराम पाटील, सुरेश कुलकर्णी, मनोज हळदणकर; मनसेचे अभिजित देसाई आणि विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांनी एसआरएला विरोध दर्शवला.

"नवी मुंबईवर संकट येताच मंत्री गणेश नाईकांची नागरिकहिताची भूमिका खंबीर असते," असे सभागृह नेते सागर नाईक म्हणाले.

# उभरते सितारे मध्ये ‘विज्ञान दर्पण’ विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाचा नवोदित प्रतिभांना समर्पित उपक्रम

## ‘उभरते सितारे’चा कार्यक्रम हिंदी मोर भवनच्या उत्कर्ष हॉलमध्ये आयोजित करण्यात आला

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर:** कार्यक्रमाचा विषय ‘विज्ञान दर्पण’ असा असून तो शैक्षणिक, ज्ञानवर्धक आणि संगीतमय सादरीकरणांनी परिपूर्ण होता. कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून केंद्रीय विद्यालयाचे सेवानिवृत्त उपप्राचार्य नबेंदु साहा उपस्थित होते. त्यांचा सत्कार साहित्य मंत्री सागर खादीवाला, संयोजक युवराज चौधरी आणि सहसंयोजिका वैशाली मदारे यांनी स्वागत वस्त्र व स्मृतिचिन्ह देऊन केला.



आपल्या भाषणात नबेंदु साहा यांनी ‘उभरते सितारे’ या उपक्रमाच्या मंचाचे तसेच मुलांच्या सादरीकरणांचे मनापासून कौतुक केले. या प्रसंगी पद्मा इंटरनॅशनल शाळेच्या संचालिका श्रीमती निरजा शंभरकर प्रामुख्याने उपस्थित होत्या. त्यांनी विज्ञान आणि धर्म यांचा संबंध उपवासाच्या उदाहरणाद्वारे सुंदरपणे स्पष्ट केला.यानंतर सर्व मुलांनी ‘विज्ञान दर्पण’ या विषयावर सुंदर विचार मांडत उत्कृष्ट नृत्य आणि गीत सादर केले. यामध्ये स्वराज ढोके, सुतिक्ष सुरज रामटेके, देवांशी पटनायक, राम बागल आणि आदित मिंज यांनी अतिशय सुंदर गीते सादर केली. पद्मा इंटरनॅशनल स्कूलमधील अवनी संदीप गायकवाड, स्वराज ढोके, अन्विका कांबळे, अधीरा साहू, आरव मछले, धानू यादव तसेच जेके डान्स अकॅडमीचा अयान अश्विन लिखारे यांनी उत्कृष्ट गोंधळ नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली. मुलांच्या सादरीकरणाचे त्यांच्या पालकांसह जगदीश दळवी, गीता सुरेश मिंज, पालिका बागडे, नेहा सुरेश रामटेके, देवस्मिता पटनायक, प्रिती अभिजीत बागल, राहुल गुप्ता आदींनी भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशांत शंभरकर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सुयोग्य संचालन सहसंयोजिका वैशाली मदारे यांनी केले. तसेच उपस्थित सर्व प्रेक्षक, कलाकार आणि मुलांचे आभार संयोजक युवराज चौधरी यांनी आपल्या शब्दांत व्यक्त केले.

# नावली–नेतंसा पांदन रस्त्याच्या खडीकरण कामाचा शुभारंभ

## आ. अमित झनक यांच्या हस्तेभूमिपूजन, विकासाच्या दिशेने मोठे पाऊल!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड नावली ते नेतंसा पांदन रस्त्याच्या खडीकरण कामाचा शुभारंभ मा. आमदार तथा जिल्हा काँग्रेस कमिटी वाशिमचे अध्यक्ष अमित सुभाषराव झनक यांच्या हस्ते विधिवत भूमिपूजन करून करण्यात आला. या महत्त्वपूर्ण कामामुळे परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली असून ग्रामीण विकासाच्या दृष्टीने हे एक मोठे पाऊल मानले जात आहे.

या वेळी कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भूमिपूजन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी फटाक्यांची आतषबाजी व जल्लोष करत आनंद व्यक्त केला.



या रस्त्याचे खडीकरण पूर्ण झाल्यानंतर नावली ते नेतंसा दरम्यानचा प्रवास अधिक सुलभ आणि सुरक्षित होणार आहे. विशेषतः शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीसाठी मोठी मदत होणार असून विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेजमध्ये ये-जा करणे सोपे होईल. पावसाळ्यात होणाऱ्या चिखल व अडचणींचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

यावेळी आमदार अमित झनक यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, “ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास हा आमचा प्राधान्यक्रम असून प्रत्येक गावापर्यंत मूलभूत सुविधा पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. रस्ते, पाणी, वीज या सुविधा सक्षम झाल्यास गावांचा विकास वेगाने होईल.” त्यांनी पुढील काळातही अशाच विकासकामांना गती देण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. गावकऱ्यांनी आमदारांचे आभार मानत भविष्यातही अशाच विकासकामांची अपेक्षा व्यक्त केली. एकूणच, नावली–नेतंसा पांदन रस्त्याच्या खडीकरण कामाच्या भूमिपूजनामुळे परिसरात विकासाची नवी आशा निर्माण झाली असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# अंधारात डही गाव; संतप्त नागरिकांची महावितरण कार्यालयावर धडक

## अधिकारी गायब, खुर्चीला हार घालून निषेध; दोन तासांत वीजपुरवठा सुरू न झाल्यास शिवसेनेच्या स्टाईलने आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव महावितरण कंपनीच्या भोंगळ व हलगर्जी कारभारामुळे डही (वारंगी) येथील नागरिकांचा संयम अखेर संपला असून गेल्या तब्बल आठ दिवसांपासून गाव अंधारात असल्याने नागरिकांनी आज संतप्त होत महावितरण कार्यालय मालेगाव येथे धडक दिली. राज्यात तसेच वाशिम जिल्ह्यात उष्णतेची लाट तीव्र असताना वीजपुरवठा खंडित राहिल्यामुळे नागरिकांचे हाल होत असून महावितरणकडून ग्राहकांची आर्थिक व मानसिक पिळवणूक होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.



गेल्या आठ दिवसांपासून सतत वीज नसल्यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. पिण्याच्या पाण्यापासून ते घरगुती कामांपर्यंत सर्वच गोष्टींवर परिणाम झाला असून शेतकरी, व्यापारी व सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याने अखेर ग्रामस्थांनी थेट कार्यालय गाठत जाब विचारण्याचा प्रयत्न केला.मात्र, कार्यालयात एकही जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्याने नागरिकांचा संताप अधिकच भडकला. संतप्त ग्रामस्थांनी प्रतीकात्मक निषेध म्हणून महावितरण अधिकाऱ्याच्या खुर्चीला हार घालत प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध नोंदविला. या प्रकारामुळे काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, शिवसेनेचे तालुका संघटक गजानन भाऊ बोरचाटे यांनी प्रशासनाला कडक इशारा देत सांगितले की, “आज दोन तासांच्या आत वीजपुरवठा सुरळीत झाला नाही, तर शिवसेनेच्या स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण प्रशासनाची राहील.”

या आंदोलनात शिवसेना (उबाठा) मालेगाव तालुका समन्वयक भगवानराव बोरकर तसेच शिवसेना मालेगाव तालुका उपप्रमुख (उबाठा) विजयजी शेंडगे यांच्यासह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. या घटनेमुळे महावितरणच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासनाने तातडीने लक्ष घालून वीजपुरवठा पूर्ववत करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# बलशाली राष्ट्र निर्मितीसाठी सक्षम युवा पिढीची गरज – डॉ. ज्ञानोबा ढगे

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** 21 व्या शतकातील वाढत्या स्पर्धात्मक युगात युवकांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागत असून या संघर्षातून जीवनमूल्य जपत यशस्वी होण्याचा प्रयत्न ते करत आहेत. आजचे जनजीवन तणावग्रस्त झाले असले तरी समाज आणि राष्ट्र बलशाली घडवण्यासाठी तणावमुक्त, सक्षम आणि सुदृढ युवा पिढी घडवणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी केले.ते कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, निफाड येथे आयोजित डॉ. एम. आर. जयकर रोजगार कौशल्य कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. ही कार्यशाळा दिनांक 15 एप्रिल ते 18 एप्रिल 2026 या कालावधीत पार पडली असून विद्यार्थ्यांसाठी विविध तज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ज्ञानोबा ढगे होते. प्रमुख वक्त्या डॉ. श्रीमती एस. आर. जाधव यांनी सध्याच्या स्पर्धात्मक युगात कौशल्यांचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. डॉ. आर. डी. शिंदे यांनी करिअरच्या विविध संधींबाबत सविस्तर माहिती देत योग्य दिशा निवडण्याचे महत्त्व पटवून




दिले. प्रा. बी. बी. ताकाटे यांनी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वृद्धीसाठी प्रेरणादायी विचार मांडले आणि व्यवहारिक जीवनात कौशल्यांचा उपयोग कसा होतो हे स्पष्ट केले.या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. रवींद्र अहिरे व डॉ. बी. सी. आहेर यांनी उत्कृष्ट नियोजन केले. कार्यशाळेत गटचर्चा, मॉक इंटरव्ह्यू, सादरीकरण कौशल्य आणि करिअर मार्गदर्शन सत्रांचा समावेश होता, ज्यामुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक अनुभव मिळाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीमती यू. डी. जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. समाधान वायकंडे यांनी केले. या कार्यशाळेस प्रा. अतुल आहेर, प्रा. निकेतन महाले, प्रा. डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. डॉ. महेश बनकर, प्रा. अविनाश पिंपरकर यांसह प्राध्यापकवृंद आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# आपत्ती व्यवस्थापन कोर्स करून सुरक्षित रहा ! – प्रा. डॉ. जयपाल पाटील

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** आपण व आपल्या कुटुंबीयांवर घर रस्ता अपघात आणि नैसर्गिक आपत्ती कधी केव्हा येईल हे सांगता येत नाही यासाठी शनिवार दिनांक २५ व रविवार २६ रोजी दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिरात सामील व्हा असे आवाहन आपत्ती व्यवस्थापन तज्ञ रायगड भूषण प्राध्यापक डॉ. जयपाल पाटील यांनी केले आहे. आपत्ती व्यवस्थापनाचा प्रशिक्षण त्यांनी मुंबई दिल्ली डेहराडून येथे झालेल्या जागतिक आपत्ती परिषदेमध्ये घेतले असून, भारत सरकारच्या गृह मंत्रालया च्या आपत्ती व्यवस्थापन कॉलेजमध्ये तर प्रगत शिक्षण भारतीय सैन्याच्या शिखरेजमेंट रांची येथे घेतल्यामुळे महाराष्ट्र शासनाने आपत्ती सुरक्षेचा विषय जनतेपर्यंत पोहोचला पाहिजे म्हणून नागरी संरक्षण दल रायगडचा जनसंपर्क अधिकारी



म्हणून नियुक्त केले होते, रायगड जिल्ह्यातील ५० हजार नागरिकांना प्रशिक्षण दिल्याने" रायगड भूषण" सन्मान दिला. यानंतर महाराष्ट्रात १ लाख नागरिकांना प्रशिक्षित केल्यावर छत्रपती शिवाजी महाराज लोक विद्यापीठ अमरावती यांनी शेतकरी आणि समाजसेवे च्या कार्याबाबत पहिली ऑनररी डॉक्टरेट प्रदान केली. आसाम, गुजरात, कर्नाटक, तेलंगणा आणि उत्तर प्रदेश येथील नागरिकांना आपत्ती सुरक्षेचे प्रशिक्षण दिल्याने स्वर्गीय दिन दयाळ उपाध्याय हिंदी विद्यापीठ मथुरा, उत्तर प्रदेश यांनी समाजसेवा व आपत्ती व्यवस्थापन कार्याबाबत दुसरी ऑनररी डॉक्टरेट प्रदान केली आहे. ते स्वतः साहित्यिक असून आतापर्यंत त्यांची १० पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यापैकी विशेष म्हणजे दोन पुस्तके लहान मुलांसाठी मैत्री गाणी आणि गंमत गाणी असून ६० बालकविता रशियन भाषेत होऊन त्यांना कामगार कवी म्हणून रशियन सरकारने कामगार अभ्यास दौऱ्यात सहभागी केले होते. त्या बालकविता ताश्कंद आणि मास्को आकाशवाणी वरून रशियन भाषेत प्रसारित झाल्या होत्या आणि मैत्री गाणी या पुस्तकास कुसुमाग्रज कैलासवासी विवाह शिरवाडकर यांची प्रस्तावना लाभली होती. त्यांनी लिहिलेले आपत्ती सुरक्षा हे पुस्तक जगभरात प्रसिद्ध झाले आहे. त्याची प्रस्तावना निवृत्त सैन्य अधिकारी लेफ्टनंट कर्नल लक्ष्मीकांत देसाई यांनी दिली होती. आता त्यांचे "आपत्ती मित्र" आणि "शेतकऱ्यांची आगीपासून सुरक्षा"हे पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

देशभरातील लाखो नागरिक यामध्ये पोलीस ग्रामसेवक मंडळ अधिकारी तलाठी नायब तहसीलदार प्राथमिक शाळेतील विद्यार्थी आणि महाविद्यालयीन विद्यार्थी अशाना ६८३ व्याख्याना द्वारे सोबत आकाशवाणी मुंबई वरून शेतकऱ्यांसाठी, रत्नागिरी युवक युवतींसाठी, कोल्हापूर ज्येष्ठ नागरिकांसाठी, सोलापूर कामगारांसाठी, गोवा येथून जनतेसाठी, प्रजापिता ब्रह्माकुमारी माउंट आबू राजस्थान यांच्या एफएम चॅनेल वरून महिलांसाठी, पुणे एफएम चॅनेल वरून जनतेसाठी, राहुरी कृषी विद्यापीठाच्या एपीएम चॅनेल वरून शेतकऱ्यांसाठी अशा लाखो नागरिकांना आत्तापर्यंत प्रशिक्षण दिले आहे. २ दिवसीय शिबिरात सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत प्रशिक्षणात सर्व प्रकारचे प्रात्यक्षिक डॉ. जयपाल पाटील व त्यांचे रायगडचा युवक फाउंडेशनचे तज्ञ, निवृत्त सैन्य अधिकारी आणि पोलीस अधिकारी, डॉक्टर, वकील, शिक्षक, प्राध्यापक आणि सामाजिक कार्यकर्ते प्रशिक्षण देऊन प्रमाणपत्र देणार आहेत. यासाठी फी रुपये १५००/- घेण्यात येणार असून चहा, नाश्ता, भोजन, शनिवारी १ दिवस निवास व्यवस्था वात्सल्य वृद्धाश्रम आणि गोशाळा महादू नगर सांबरी येथे प्रगतिशील शेतकरी आणि रायगडचा युवक फाउंडेशनचे आपत्ती सुरक्षा मित्र श्री. संतोष पाटील यांच्या येथे करण्यात आली आहे. यामध्ये शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी, ज्येष्ठ, निवृत्त कर्मचारी अधिकारी, शेतकरी पुरुष महिला कामगार, नागरिक सहभागी होऊन आपण व आपले कुटुंबीय व शेजारी सुरक्षित राहू शकता कारण काळाची गरज आहे म्हणून सुरक्षित कसे प्रत्येकाने राहावे यासाठी या शिबिरात सामील व्हा असे गुणवंत कामगार, आदिवासी सेवक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण, महाराष्ट्र शासन पुरस्कारार्थी प्राध्या. डॉ. जयपाल पाटील व सर्व सुख सोयीने निसर्गाच्या सानिध्यात वात्सल्य वृद्धाश्रम, ज्यामध्ये ६० जणांचे महिला पुरुष व ३ रूम वातानुकूलिन ,आणि शिवतेज अल्कलाइन वॉटर प्रकल्प व शेतकऱ्यांच्या मुला मुलींच्या विवाह साठी, कुठल्याही आनंदोत्सवासाठी रुपये ४०००/- फक्त भाड्याने, शुद्ध शाकाहारी रुपये १५० पोटभर भोजन उपलब्ध असून महाराष्ट्रातून अलिबाग पर्यटनास येणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना येथे फक्त १०० रुपयात शाकाहारी मांसाहारी जेवण दिले जाते. यासाठी अगोदर कळवावे लागते. हे पाहण्यास अवश्य याअसे आवाहन श्री. संतोष पाटील मो. ९८२० ६००८५७ यांनी केले आहे.

## आदित्य बिर्ला ज्वेलरीचा ब्रँड इंद्रियाने नागपूरमधील नवीन स्टोअरसह महाराष्ट्रातील आपली उपस्थिती वाढवली

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश यादव**



**वाडी नागपूर** : इंद्रियाने नागपूरमध्ये आपले पहिले स्टोअर सुरू केले आहे, जे महाराष्ट्रातील आपले स्थान अधिक मजबूत करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. हे विस्तारीकरण संघटित ज्वेलरी रिटेलची वाढती मागणी असलेल्या आणि वेगाने विकसित होणाऱ्या द्वितीय श्रेणीच्या शहरांमध्ये आपली उपस्थिती वाढवण्याच्या ब्रँडच्या धोरणाचा भाग आहे. शहरातील प्रसिद्ध रिटेल केंद्र मनिष नगर येथे हे स्टोअर मोक्याच्या ठिकाणी स्थित आहे. ग्राहकांना सुसंस्कृत आणि सुलभ खरेदीचा अनुभव देण्यासाठी हे सट्टोअर डिझाइन करण्यात आले आहे. या स्टोअरमध्ये लग्नसराई, सण-उत्सव, समकालीन आणि दैनंदिन वापरासाठी वजनाने हलक्या दागिन्यांच्या ३२,००० हून अधिक डिझाइन्स उपलब्ध आहेत. तसेच, यामध्ये खास कारागिरीसाठी स्वतंत्र रूम डिझाइन करण्यात आली आहे, ज्यामुळे दागिन्यांमधील कसब आणि ग्राहकांचा अनुभव अधिक समृद्ध होईल. डिझाइनमधील उत्कृष्टता, वैविध्यपूर्ण श्रेणी आणि ग्राहक-केंद्रित सेवा यांवर विशेष भर देणारे हे स्टोअर ग्राहकांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी सज्ज आहे. हे लाँच पश्चिम भारतामध्ये इंद्रियाचे स्थान अधिक दृढ करण्यासोबत उदयोन्मुख शहरी बाजारपेठांमध्ये विस्तार करण्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा आहे.याप्रसंगी मत व्यक्त करत इंद्रियाचे सीईओ श्री. संदीप कोहली म्हणाले, "संघटित ज्वेलरी रिटेलला मिळणारी वाढती पसंती पाहता महाराष्ट्र हे आमच्यासाठी नेहमी प्रमुख केंद्र राहिले आहे. नागपूर शहर हे परंपरा आणि आधुनिकतेचा अनोखा संगम आहे, येथे विकासाची मोठी क्षमता आहे. आमचा या स्टोअरच्या माध्यमातून आमच्या वैशिष्ट्यपूर्ण डिझाइन्स आणि खरेदीचा उच्च दर्जाचा अनुभव या भागातील ग्राहकांना देण्याचा मनसुबा आहे."आदित्य बिर्ला ग्रुपचा ब्रँड इंद्रिया नागपूरमधील या नवीन स्टोअरसह महाराष्ट्रातील आपला विस्तार सुरूच ठेवत आहे. यामुळे या प्रदेशातील आपली पकड मजबूत करण्यासह आपले आधुनिक दागिन्यांचे कलेक्शन आणि खरेदीचा खास अनुभव अधिक मोठ्या ग्राहकवर्गापर्यंत पोहोचवण्याचे ब्रँडचे ध्येय आहे.

# मोबाईलच्या आभासी जगाला दाखवली रंगाची जादू

## चित्रकार मिलिंद ठाकूर यांचा 'रंगोत्सव' मधून बालमनाला कलेची संजीवनी !

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण / प्रतिनिधी** : आजचा विद्यार्थी मोबाईलच्या आभासी दुनियेत स्वतःला हरवून बसला आहे. या अतिवापरामुळे मुलांच्या उपजत कलागुणांचा ऱ्हास होत असून ते मानसिक तणावाखाली जात आहेत. या परिस्थितीपासून विद्यार्थ्यांना वाचवण्यासाठी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना उजाळा देण्यासाठी सुप्रसिद्ध चित्रकार मिलिंद ठाकूर यांच्या संकल्पनेतून 'रंगोत्सव २०२६' हा उपक्रम राबवण्यात आला. 'योशिता आर्ट' आणि 'मथुरा महादेव एज्युकेशन सेंटर'यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या ७ दिवसीय कॅनव्हास पेंटिंग कार्यशाळेचा समारोप जेएनपीए येथील ऐतिहासिक कला प्रदर्शनाने अत्यंत दिमाखात पार पडला.



या उपक्रमाचा हेतू स्पष्ट करताना चित्रकार मिलिंद ठाकूर म्हणाले की, "प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये नवनिर्मितीची ताकद असते. त्यांच्या अंतर्मनाचे भाव कॅनव्हासवर मांडण्याची संधी देणे हाच या सोहळ्याचा मुख्य हेतू आहे." कॅनव्हासवर उमटलेला प्रत्येक रंग हा त्या मुलांच्या मनातील निरागस स्वप्नांची ग्वाही देत होता. हातातील मोबाईल बाजूला सारून जेव्हा ही मुले रंगात न्हाऊन निघाली, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान कोणत्याही यशापेक्षा मोठे होते. चिमुकल्या हातांनी साकारलेल्या रंगांच्या किमया पाहून उपस्थित पालक आणि रसिक प्रेक्षक भारावून गेले होते.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे शैक्षणिक क्षेत्रात गरुडझेप घेणाऱ्या उरणच्या २ सुकन्यांचा सत्कार.कुमारी हिताक्षी मुकुंद ठाकूर: सीबीएसई १० वीच्या परीक्षेत ९५.६ टक्के गुण मिळवून उरण व पनवेल तालुक्याचे नाव उंचावल्याबद्दल तिचा विशेष गौरव करण्यात आला व कुमारी सलोनी सचिन कडू हिने एमबीए पदवी संपादन करून सद्यस्थिती सिए या अत्यंत कठीण अशा व्यावसायिक अभ्यासक्रमाचे ती शिक्षण घेत आहे. तिच्या जिद्दीचा आणि शैक्षणिक वाटचालीचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवण्यात आला मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि विशेष भेटवस्तू देऊन व दोन्ही गुणवंतांना गौरवण्यात आले.

या सोहळ्याच्या उद्घाटनासाठी आणि मार्गदर्शनासाठी पत्रकार सुनील ठाकूर ,पत्रकार तृप्ती भोईर, शिक्षक नेते रमाकांत गावंड सर, मुख्याध्यापक अंकुश जोगळे सर, यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एकनाथ घरत, सिडकोचे अधिकारी सचिन कडू, शिवसेना शाखाप्रमुख अविनाश म्हात्रे, किशोर कडू, बळीराम घरत ,भूपेंद्र डाकी या मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

चिमुकल्यांच्या हातातील कुंचल्यातून उमटलेले हे सप्तरंग आणि यशाचे शिखर सर करणाऱ्या लेकींचा सन्मान संबंध झालेला पाहून पालकांना हे क्षण अभिमानास्पद वाटले. मोबाईलच्या काचेच्या पडद्यापलीकडेही एक सुंदर आणि रंगीत स्वप्न व जग असते याची जाणीव यानिमित्ताने प्रत्येक मुलांना आणि पालकांनाही झाली चित्रकार मिलिंद ठाकूर यांनी कलेच्या माध्यमातून दिलेली ही संजीवनी मुलांसाठी नव्हे तर समाजाच्या सुदृढ भविष्यासाठी एक नवी उमेद देणारी ठरली आहे.

# निफाडमध्ये 'चॅम्पियन फॉर लाईफ' गोल्फ टॅलेंट हंट शिबिराला उत्साहात प्रारंभ

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी** : ग्रामीण भागात गोल्फ या खेळाचा प्रसार व्हावा आणि तळागाळातील गुणवंत खेळाडूंना संधी मिळावी या उद्देशाने निफाड येथील रिव्हर साइड गोल्फ कोर्स क्लबच्या वतीने 'चॅम्पियन फॉर लाईफ' या उपक्रमाची दमदार सुरुवात करण्यात आली. प्रोट्स स्पोर्ट्स आणि साई बाबा सेवाश्रम यांच्या सहकार्याने आयोजित या टॅलेंट हंट शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमांतर्गत ७ ते ११ आणि १२ ते १७ अशा दोन वयोगटांमध्ये खेळाडूंची निवड केली जात असून, ग्रामीण भागातील मुलांना गोल्फचे प्रशिक्षण देऊन त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यावर भर दिला जात आहे.



शिबिराचे उद्घाटन पिंपळगाव बसवंतचे आमदार दिलीप बनकर यांच्या हस्ते झाले. यावेळी विंग कमांडर अरुणकुमार सिंग, जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, क्रीडा संघटक अशोक दुधारे, भारताचे चीफ कोच इंद्रजित बालोटिया तसेच रिव्हरसाईड गोल्फ कोर्सचे संचालक आणि उपक्रम प्रमुख विंग कमांडर प्रदीप बागमार उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार दिलीप बनकर यांनी सांगितले की, निफाडमध्ये गोल्फसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत आणि हा खेळ ग्रामीण भागात रुजविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. महागडा समजला जाणारा हा खेळ लहान मुलांना मोफत प्रशिक्षणाद्वारे उपलब्ध करून दिला जात असल्याने, स्थानिक खेळाडूंनी या संधीचा लाभ घ्यावा आणि नाशिकचे नाव राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वल करावे, असे त्यांनी आवाहन केले. या खेळाच्या विकासासाठी आवश्यक ती सर्व मदत केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांनी गोल्फ हा ऑलिंपिक खेळ असून, शालेय स्तरावरूनच खेळाडू घडविण्याची ही योग्य सुरुवात असल्याचे सांगितले. तर चीफ कोच इंद्रजित बालोटिया यांनी या उपक्रमातून सुमारे ३०० मुलांची निवड करून त्यांना दर्जेदार प्रशिक्षण देण्याचा मानस व्यक्त केला. भविष्यात नाशिकमधून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याचे लक्ष्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

या शिबिरात निफाड, पिंपळगाव आणि नाशिक परिसरातील १३ शाळांमधील एकूण ४३० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. यावेळी शिक्षकांसह परिसरातील अनेक मान्यवर आणि क्रीडाप्रेमी नागरिक उपस्थित होते.

एकूणच, 'चॅम्पियन फॉर लाईफ' हा उपक्रम ग्रामीण भागातील खेळाडूंना नवे व्यासपीठ उपलब्ध करून देत असून, गोल्फसारख्या खेळाचा प्रसार करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल मानला जात आहे.

## उमरी रेल्वे स्टेशन येथे प्रवासी सुरक्षिततेसाठी जनजागृती कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**उमरी वार्ताहर / रुपेशकुमार ग.श्रीरामवार :** उमरी रेल्वे स्टेशन येथे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी व नियमांचे पालन व्हावे यासाठी आरपीएफ धर्माबाद यांच्या वतीने ही जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून सर्व नागरिकांनी खबरदारी बाळगत नियमांचे पालन करावे. प्रवाशांसाठी रेल्वे नियमाचे पालन कसे करावे व रेल्वेचे नियम कोणते हे पुढील प्रमाणे सांगण्यात आले. १) उमरी रेल्वे स्टेशन परिसरात विना तिकीट अथवा प्लॅटफॉर्म तिकीट शिवाय फिरणे हा रेल्वे कायद्यानुसार गुन्हा आहे. २) प्लॅटफॉर्म क्रमांक १ वरून प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर जाण्यासाठी दादरा (Foot Over Bridge) चा वापर करणे बंधनकारक आहे. दादऱ्याचा वापर न करता ट्रॅक ओलांडल्यास रेल्वे ॲक्ट कलम 147 नुसार गुन्हा दाखल करण्यात येईल. 3) उंबरी रेल्वे स्टेशनच्या बाहेर आपली दुचाकी वाहने ऑटो फोर व्हीलर (पार्किंग ) मध्येच लावावे न लावल्यास आपले वाहन जप्त करून त्यांच्यावर रेल्वे कायद्यानुसार कलम १५९




गुन्हा दाखल करण्यात येईल. ४) उमरी रेल्वे स्थानकावर न थांबणाऱ्या गाड्यांची चेन ओढून उभी केल्यास व त्या गाडीतून उतरल्यास गाडीची चेन वाढल्याचा गुन्हा दाखल करण्यात येईल रेल्वे कायदा कलम 141 नुसार तरी सर्व प्रवाशांनी याची नोंद घ्यावी.प्रवासी सुरक्षिततेसाठी जनजागृती कार्यक्रमास उपस्थित हैदराबाद डिव्हिजन रेल्वे डीआरयुसीसी मेंबर पारसमल दर्डा , सीसीआय रमेश निजामबाद, उमरी रेल्वे स्टेशन सुप्रीडेंट भरतलाल मीना , सहाय्यक उपनिरीक्षक राम आशिष कुमार धर्माबाद, आरपीएफ एकनाथ वाघमारे , रेल्वे स्टेशन वरील कर्मचारी व प्रवासी यावेळी उपस्थित होते.

## निफाड येथील रिव्हर साइड गोल्फ कोर्स क्लबच्या वतीने आयोजित "चॅम्पियन फॉर लाईफ" शिबिराला मोठ्या उत्साहात सुरवात

**दैनिक युवक आधार**
**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : गोल्फ खेळ सर्वदूर आणि विशेषतः ग्रामीण भागामध्ये रुजविण्यासाठी आणि तळागाळातील खेळाडू घडविण्यासाठी नाशिकच्या निफाड येथील रिव्हर साइड गोल्फ कोर्स क्लबच्या वतीने आणि प्रोट्स स्पोर्ट्स आणि साई बाबा सेवाश्रम यांच्या सहकार्याने 'चॅम्पियन फॉर लाईफ' या उपक्रमाचा शुभारंभ आज दिनांक १९ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. गोल्फ या खेळाच्या माध्यमातून वंचीत खेळाडूंना चांगली संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने "चॅम्पियन फॉर लाईफ" या उपक्रमा अंतर्गत टॅलेंट हंट शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये वय वर्षे सात ते अकरा आणि बारा ते सतरा असे दोन वयोगट आहेत.



या उपक्रमाचे उदघाटन नाशिकच्या पिंपळगाव बसवंतचे आमदार दिलीप बनकर यांच्या हस्ते आणि विंग कमांडर अरुणकुमार सिंग,मा. जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, क्रीडा संघटक अशोक दुधारे, भारताचे चीफ कोच इंद्रजित बालोटिया आणि रिव्हरसाईड गोल्फ कोर्सचे संचालक आणि या उपक्रमाचे प्रमुख विंग कमांडर प्रदीप बागमार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी बोलतांना आमदार दिलीप बनकर यांनी बोलतांना सांगितले की, निफाड येथे विंग कमांडर प्रदीप बागमार यांनी गोल्फ या खेळाच्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत, आणि हा खेळ तळागाळापर्यंत जावा यासाठी असे विविध उपक्रम राबवत आहेत. तसेच या खर्चिक खेळासाठी लहान वयोगटाच्या खेळाडूंना मोफत प्रशिक्षण आणि सुविधा देत आहेत. त्यामुळे नाशिकच्या खेळाडूंनी याचा उपयोग करून घेत या खेळामध्ये नाशिकचे नाव राज्यात, भारतात आणि जगामध्ये उज्वल करावे असे सांगितले. या खेळाच्या प्रगतीसाठी ज्या-ज्या प्रकारे मदत आवश्यक आहे या सर्वांची पूर्तता केली जाईल असे सांगितले. यावेळी रवींद्र नाईक सांगितले की, हा ऑलिंपिक खेळ आहे. आणि मुलांसाठी अश्या प्रकारे उपक्रम राबवून खऱ्या अर्थाने उत्तम सुरवात होत आहे, कारण शालेय स्तरापासूननच खेळाडू राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत जातो असे सांगितले. चीफ कोच इंद्रजित बालोटिया यांनी सांगितले की, या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांना गोल्फचे प्रशिक्षण देणे आणि मुलांचा विकास करणे हा आहे. याचाच एक भाग म्हणून या निफाड परिसरातील ३०० मुलांची निवड केली जाणार आहे, आणि उपक्रमाच्या माध्यमातून नाशिकमधून दर्जदार राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवण्याचा आमचा मानस आहे असे सांगितले.

या शिबिरामध्ये निफाड, पिंपळगाव, आणि नाशिकच्या १३ शाळांचे एकूण ४३० खेळाडू सहभागी झाले आहेत. हे सर्व खेळाडू आणि त्यांचे शिक्षक तसेच परिसरातील नितीन कदम, शंकरराव वाघ, सायली पालखेडकार, ॲड. संजय पाटील-दरेकर, ॲड. अरविंद बडवर, वी. दा. व्यवहारे, डॉ. मनोज बर्डे, निरभवाने सतीश मोरे, संजय पवार, सौ. मिनाक्षी जगदाळे, ह. भ. प. संगीताताई गुंजाळ, सौ. ज्योत्स्ना सुरवाडे, गणेश गुरव, साहिल शेख, समीर हमीद शेख, दीपक गोपाळे, सागर डोखळे, प्रदीप राठोड, आकाश अहिरे यांची उपस्थिती होती.

## पोटहिस्सा मोजणी व नकाशे अद्यावतीकरण पथदर्शी प्रकल्पात विभागातील पंधरा गावांचा समावेश

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : नकाशा व अधिकार अभिलेख संलग्न करण्यासोबतच प्रत्येक भूभागास अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक देण्यासाठी नकाशाची पोटहिस्सा विभागणी हा महत्त्वाचा विषय प्रकल्प भूमी अभिलेख विभागातर्फे पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये नागपूर विभागातील पंधरा गावांची निवड करण्यात आली असल्याची माहिती भूमी अभिलेख उपसंचालक डॉ. लालसिंग मिसाळ यांनी दिली.

पोटहिस्सा मोजणी व नकाशे अद्यावतीकरण करणे हा प्रथमदर्शी प्रकल्प राज्यातील सहा विभागातील 18 तालुक्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत आहे. या पथदर्शी प्रकल्पामुळे सर्वे नंबर, गट नंबरमध्ये तयार झालेल्या पोटविषयाची मोजणी करणे अधिकार, अभिलेख सातबारा व नकाशा अद्यावत करून मिळेल तसेच प्रत्येक भूभागास भू आधार क्रमांक देणे हा या पथदर्शी प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

या पथदर्शी प्रकल्पामध्ये विभागातील नागपूर, भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यातील कुही, तुमसर व बल्लारपूर तालुक्यांची निवड करण्यात आली असून, प्रत्येक तालुक्यातील पाच गावे याप्रमाणे पंधरा गावांची निवड करण्यात आली आहे. या गावांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात येत असून समाधान शिबिराच्या माध्यमातून पोटहिस्सा मोजणी बाबत जनतेमध्ये जागृती निर्माण करण्यात येत असल्याची माहिती भूमी अभिलेख उपसंचालक डॉ. लालसिंग मिसाळ यांनी दिली.

नकाशा आणि अधिकार अभिलेख सातबारा अद्ययावत नसल्यामुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने कृषी विषयक योजना, कृषी वित्त पुरवठा, नुकसान भरपाई देण्याच्या योजनांचा समावेश आहे. या योजनांसाठी पीक सर्वेक्षण प्रभावी आणि अचूक असणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतजमिनीच्या भूभागांचे धारक तसेच खातेनिहय पोटविषयाची मोजणी करून पोटहिस्सा भूभागाची सीमा व क्षेत्र निश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे अधिकार अभिलेखे व नकाशे तंतोतंत ठेवणे आवश्यक आहे.

विभागातील तीन तालुक्यांमधील पंधरा गावांमध्ये पोटहिस्सा मोजणीच्या कामाला सुरुवात झालेली आहे. यामध्ये एकत्र कुटुंबातील धारण जमिनीच्या दिशांची मोजणी करण्याच्या प्रस्तावासही मान्यता मिळाली असून, भूमी अभिलेख कार्यालयात एकत्र कुटुंबातील धारण जमिनीच्या दिशांची मोजणी फी २०० रुपये प्रति पोटहिस्सा निश्चित करण्यात आला आहे. या पथदर्शी प्रकल्पास सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन नागपूर विभागाचे भूमी अभिलेख उपसंचालक डॉ. लालसिंग मिसाळ यांनी केले आहे.

## पंढरपूर विकास आराखड्याच्या कामास गती देण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**मुंबई** : आषाढी वारी काळात निघणाऱ्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी दोन्ही पालखी मार्गावरील पालखीतळे अधिक चांगली व सुविधायुक्त करण्यात यावीत, वारकरी भाविकांना अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी तसेच पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना व स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी पंढरपूर विकास आराखड्याच्या कामास गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पालखी मार्गावरील विश्रामस्थळ सुविधा निर्मिती संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आदी यावेळी उपस्थित होते.

# राम कुलकर्णी यांची भारतीय जनता पक्षाच्या राज्य प्रवक्तेपदी फेरनिवड

## कुलकर्णी यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत



**अंबाजोगाई :** भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण यांनी जाहीर केलेल्या नवीन कार्यकारिणीत राम कुलकर्णी यांची भाजपा राज्य प्रवक्तेपदी फेरनियुक्ती करण्यात आली आहे. कुलकर्णी यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

पक्ष संघटन बळकट करण्याच्या उद्देशाने, घोषित करण्यात आलेल्या नव्या कार्यकारिणीत अनुभवी नेत्यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे, ज्यामध्ये राम कुलकर्णी यांचा समावेश आहे. संघटनात्मक फेररचना आणि आगामी निवडणुकांसाठीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर कुलकर्णी यांची निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे. त्याला कारण ही तसेच आहे. राम कुलकर्णी हे यापूर्वीही भाजपाचे राज्य प्रवक्ते म्हणून जबाबदारी सांभाळत असून, शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत यांच्या विधानांना वेळोवेळी जशास तसे प्रत्युत्तर दिल्यामुळे कुलकर्णी हे चर्चेत आले होते.

भाजपाने प्रदेश प्रवक्ता विस्तारित यादी जाहिर केली असून त्यात ज्येष्ठ पत्रकार राम कुलकर्णी यांची पुन्हा प्रदेश प्रवक्ता म्हणुन फेरनियुक्ती करण्यात आली. मागच्या 8 वर्षांपासून मुख्यमंत्री मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्रजी चव्हाण, ना.पंकजाताई मुंडे, महसूलमंत्री ना.बावनकुळे साहेब यांच्या नेतृत्वाखाली पक्ष प्रवक्तेपदी काम करताना संघटनात्मक कार्य आणि पक्षाची बाजू माध्यमांकडे प्रभावीपणे मांडण्यात ते नेहमीच अग्रेसर राहिले.

# आता वडिलोपार्जित जमीनीचे वाटपही झाले सुकर

## शेतजमिनीच्या वाटणीपत्रासाठी नोंदणी शुल्क माफ

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णयराज्य सरकारकडून परिपत्रक जारी

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर :** राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा देत राज्य सरकारने शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क संपूर्ण माफ केले आहे. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाने आज जारी करण्यात आले.

आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांसह, आपसातील संमतीने थेट दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी येणाऱ्या वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटणीपत्रांनाही नोंदणी शुल्कातून पूर्णपणे माफी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री ददेवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे.

शासनाने २३ जून २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, कलम ८५ अन्वये एकाच कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली होती. या कलमांतर्गत वाटणीपत्राचे अधिकार तहसीलदारांना आहेत. परंतु, अनेक नागरिक तहसीलदारांकडे न जाता थेट दुय्यम निबंधक कार्यालयात आपसातील संमतीने वाटणीपत्र नोंदणीसाठी सादर करत होते. अशा वेळी मूळ अधिसूचनेत स्पष्ट तरतूद नसल्याचे कारण देत दुय्यम निबंधक कार्यालयांकडून नोंदणी शुल्क आकारले जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते.

शेतकऱ्यांचा होणारा हा गोंधळ दूर करण्यासाठी शासनाचे महत्वाचे पाऊल उचलले असून महसूल विभागाने आता याबाबत स्पष्ट आदेश दिले आहेत. नवीन स्पष्टीकरणानुसार कलम ८५ अंतर्गत तहसीलदार स्तरावरून होणाऱ्या वाटणीपत्रांच्या नोंदणीसाठी कोणतेही शुल्क लागणार नाही. वडिलोपार्जित शेतजमिनीबाबत वारसा हक्क प्राप्त झालेल्या सर्व सहधारकांनी एकत्र येऊन थेट नोंदणी कार्यालयात सादर केलेल्या वाटणीपत्रालाही आता नोंदणी शुल्कातून सूट मिळेल.

एकाच कुटुंबातील सदस्यांमध्ये झालेल्या शेतजमिनीच्या वाटप दस्तावरही कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

या निर्णयामुळे शेतजमिनीच्या वाटणीसाठी होणारा खर्च वाचणार असून प्रलंबित वादांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

**एकाच कुटुंबातील सदस्यांनी आपसात वडिलोपार्जित जमीनीचे वाटप केल्यास त्याचे नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हे अधिकार तहसीलदारांना होते. पण, काही लोक थेट दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन नोंदणी करत होते. त्यासाठीच्या नियमात स्पष्टता नसल्याने नोंदणी फी आकारली जात होती. ही अडचण दूर करण्यासाठी नव्याने हे स्पष्टीकरण देण्यात आले असून आता तहसीलदार किंवा नोंदणी कार्यालयात कुठेही गेला तरी नोंदणी फी भरावी लागणार नाही. याचा राज्यातील सर्व शेतकऱ्यांना फायदा होणार आहे."***

**चंद्रशेखर बावनकुळे**
**महसूलमंत्री, महाराष्ट्र**

# सिंपल एनर्जी'चे नागपुरातील पहिले स्टोअर सुरू; महाराष्ट्रातील विस्तार-योजनेस गती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर :** भारतीय वाहन क्षेत्रातील 'सिंपल एनर्जी' या कंपनीने नागपुरात आपले पहिले 'सिंपल स्टोअर' सुरू केले आहे. यामुळे महाराष्ट्रातील कंपनीचे विक्री जाळे अधिक विस्तारले आहे. 'ट्रिनिटी ऑटोमोबाइल्स'च्या भागीदारीत सुरू करण्यात आलेले हे स्टोअर ४५० चौ. फुटांचा तळमजला आणि २५० चौ. फुटांचा मधला मजला (मेझानाइन एरिया) यांमध्ये व्यापलेले आहे. यासोबतच शोरूमपासून १.९ किमी अंतरावर १३०० चौ. फूट क्षेत्रफळाचे पूर्ण सुविधांनी सज्ज सर्व्हिस सेंटरही उभारण्यात आले आहे. स्टोअर आणि सर्व्हिस सेंटर एकत्र सुरू करण्याच्या ब्रँडच्या धोरणावर हा विस्तार आधारित असून, ग्राहकांना विक्रीनंतरची सोयीस्कर सेवा आणि गाडीच्या मालकीचा अधिक चांगला अनुभव देण्यावर कंपनीचा भर आहे.

आधुनिक आणि ग्राहककेंद्रित रचनेत तयार केलेले हे स्टोअर ग्राहकांना 'सिंपल'च्या ब्रँडचा प्रत्यक्ष अनुभव देण्याच्या अनुषंगाने डिझाइन केलेले आहे. येथे कंपनीच्या विविध उत्पादनांची विस्तृत श्रेणी प्रदर्शित करण्यात आली आहे. यात नव्याने सादर केलेले 'सिंपल अल्ट्रा' मॉडेल समाविष्ट आहे. त्याची 'आयडीसी रेंज' ४०० किमी आहे. या उद्योगात ही एवढी रेंज आघाडीची मानली जाते. या स्टोअरमध्ये 'सिंपल वन जेन टू' हे मॉडेलही उपलब्ध आहे. त्याची 'आयडीसी रेंज' २६५ किमी असल्याचे सांगितले जाते. तसेच येथील 'सिंपल वन-एस जेन टू' या मॉडेलची 'आयडीसी रेंज' १९० किमी आहे. याशिवाय विविध ॲक्सेसरीजचीही मोठी श्रेणी येथे उपलब्ध आहे.

स्टोअरच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना 'सिंपल एनर्जी'चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास राजकुमार म्हणाले, "नाशिक आणि छत्रपती संभाजी महाराज नगर यांसह महाराष्ट्रात आम्ही नुकतीच काही स्टोअर्स सुरू केली आहेत. आम्ही वेगाने विस्तार करीत आहोत. नागपूरमधील हे नवीन स्टोअर हे या विस्तार-योजनेतील महत्त्वाचे पाऊल आहे. यातून विद्युत वाहनांसाठी मोठी क्षमता असलेल्या बाजारपेठांमध्ये आमचे मोठे अस्तित्व निर्माण होईल आणि ग्राहकांपर्यंत 'सिंपल एनर्जी'चा अनुभव अधिक जवळून पोहोचेल. या माध्यमातून लांब पल्ल्याची, विश्वासार्ह आणि खऱ्या अर्थाने निश्चिंतपणे वापरता येतील अशा दुचाकी उपलब्ध करून देत 'इलेक्ट्रिक मोबिलिटी'कडे होणारे परिवर्तन अधिक वेगाने घडवून आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. अधिकाधिक रायडर्सपर्यंत उच्च-कार्यक्षमता असलेली ईव्ही पोहोचवण्याच्या आमच्या उद्दिष्टाकडेही आम्ही वाटचाल करत आहोत."

सध्या 'सिंपल एनर्जी'चे देशभरातील ३६ शहरांमध्ये जवळपास ७० आउटलेट्स सुरू आहेत. यामध्ये बंगळुरू, दिल्ली, पाटणा, भोपाळ, आग्रा, गोवा, विजयवाडा, हैदराबाद, विशाखापट्टणम, कोची आणि चेन्नई यांसारख्या शहरांचा समावेश आहे. कंपनी भारतभर आपला विस्तार वेगाने वाढवत आहे. येत्या काही महिन्यांत रांची, भुवनेश्वर आणि इतर शहरांमध्येही सिंपल एनर्जी प्रवेश करणार आहे.'सिंपल वन'ची किंमत १,८९,९९९ रुपये (एक्स-शोरूम, महाराष्ट्र) पासून सुरू होते, तर 'सिंपल वन-एस जेन टू'ची किंमत १,६४,९९९ रुपये (एक्स-शोरूम, महाराष्ट्र) पासून आहे. 'सिंपल अल्ट्रा'ची किंमत २,३४,९९९ रुपये (एक्स-शोरूम, महाराष्ट्र) आहे. 'टेस्ट राइड'साठी, ॲक्सेसरीज पाहण्यासाठी किंवा स्कूटर बुक करण्यासाठी स्टोअरला ग्राहक भेट देऊ शकतात. टेस्ट राइड आणि बुकिंगची सुविधा https://www.simpleenergy.in/ या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. नागपूरमधील सिंपल एनर्जी स्टोअरचा पत्ता : शॉप क्रमांक २ आणि ३, प्लॉट क्रमांक २, गावंडे लेआउट, सावरकर नगर, विवेकानंद नगर, नागपूर – ४४००१५.

# औद्योगिक जमिनींसाठी GST सारखी स्वतंत्र परिषद हवी

## नियमात सुसूत्रता आणण्यासाठी 'सीआयआय'ची शिफारस



**नवी दिल्ली :** देशातील औद्योगिक जमिनींशी संबंधित नियम आणि वादांचे निराकरण करण्यासाठी 'जीएसटी'च्या धर्तीवर 'नॅशनल इंडस्ट्रियल लँड कौन्सिल' (एनआयएलसी) स्थापन करण्याचा प्रस्ताव उद्योग संघटना 'सीआयआय'ने मांडला आहे. ही परिषद राष्ट्रीय मानके निश्चित करणे, राज्यांच्या नियमांमध्ये सुसूत्रता आणणे आणि अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याचे काम करेल.टाटा स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक आणि 'सीआयआय'चे माजी अध्यक्ष टी. व्ही. नरेंद्रन यांच्या नेतृत्वाखालील 'सीआयआय लँड मिशन' या अहवालात ही शिफारस करण्यात आली आहे.भारतातील औद्योगिक जमीन व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी या अहवालात एक आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये 'नॅशनल इंडस्ट्रियल लँड बँक' तयार करण्याची प्रमुख शिफारस आहे. या 'जीआयएस' आधारित प्लॅटफॉर्ममुळे जमिनीची उपलब्धता, झोनिंग स्टेटस, पर्यावरणविषयक मर्यादा आणि मालकी हक्काची स्पष्टता याबद्दलची रिअल-टाइम माहिती गुंतवणूकदारांना मिळू शकेल. यामुळे पारदर्शकता वाढून गुंतवणुकीचे निर्णय वेगाने घेण्यास मदत होईल, असे अहवालात नमूद केले आहे. विविध राज्यांमध्ये मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्कात असलेली मोठी तफावत प्रकल्पांचा खर्च वाढवते, याकडेही 'सीआयआय'ने लक्ष वेधले आहे.

# मेट्रो, रिंगरोड, डबल डेकर रस्ते प्रकल्पामुळे कल्याण-डोंबिवलीतील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



## एमसीएचआय प्रॉपर्टी प्रदर्शनाला एकनाथ शिंदे यांनी दिली भेट

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली परिसरातील वाढती वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्यातून मेट्रो, रिंगरोड, डबल डेकर रस्ते, नवीन कनेक्टिव्हिटी मार्ग यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत असून, यामुळे भविष्यात कल्याण डोंबिवलीतील वाहतूक कोंडीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटेल, असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. कल्याण येथे आयोजित एमसीएचआय प्रॉपर्टी प्रदर्शनात ते बोलत होते. यावेळी कल्याण डोंबिवली महानगरपालिका महापौर हर्षाली चौधरी, केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल, शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील, थारवानी इन्फ्रास्ट्रक्चरचे एमडी मोहन थारवानी आणि एमसीएचआयचे पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. थारवानी समूहाच्या वतीने यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत करण्यात आले.

एकनाथ शिंदे यांनी यावेळी विकासकांना शासनासोबत समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. "तुमचे सर्व प्रश्न सोडवू, मात्र घरांच्या किमती सर्वसामान्यांच्या आवाक्यात ठेवा," असेही त्यांनी स्पष्ट केले. मेट्रो-५ प्रकल्पाचे टेंडर लवकरच निघणार असून शिळफाटा रस्ता तीन पदरी करण्यात येणार आहे. तसेच रांजणोली मार्गाचेही रुंदीकरण सुरू आहे. कल्याण-डोंबिवलीतील वाहतूक बाहेर वळवण्यासाठी रिंगरोड प्रकल्पासाठी भूसंपादन जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याशिवाय जेएनपीटी-वडोदरा महामार्गाला कल्याणजवळ कनेक्टिव्हिटी देण्याची विनंती कल्याण डोंबिवलीतील बांधकाम व्यवसायिकांनी केली आहे. तिचा धागा पकडत आपण संबंधितांना त्याबाबत कल्याणला अप्रोच देण्याबाबत नक्कीच सूचना करू असे त्यांनी यावेळी आश्वस्त केले. ठाणे-पडघा ८ लेन मार्ग, डबल डेकर रस्ते अशा प्रकल्पांमुळे मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक सुरळीत होईल, असे त्यांनी सांगितले. ज्यामुळे या मार्गावरील वाहतूक कोंडी पूर्णपणे सुटून जाईल असे ते म्हणाले.

पाणीपुरवठ्याबाबत बोलताना त्यांनी नवीन काळू धरणाचे काम युद्धपातळीवर सुरू असून वाढत्या लोकसंख्येची गरज लक्षात घेऊन भविष्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे नमूद केले.

विकासकांनी शहरातील रस्ते, सुविधा, सार्वजनिक कामांमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन करताना "महापालिका आणि शासन आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देईल," असे त्यांनी सांगितले.

तसेच कल्याण स्टेशन सॅटीस प्रकल्प लवकर पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना यावेळी दिल्या.

# पी .आर . जॅग्वार्सने पटकावला टीडब्ल्यूपीएल चषक




खासदार डॉ . श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

**ठाणे :** खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली टेनिस क्रिकेट स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडियाला संलग्न असलेल्या ठाणे वॉर्ड क्रिकेट कमिटीच्या वतीने ठाण्यातील पोलिस मैदान येथे आयोजित टीडब्ल्यूपीएल क्रिकेट स्पर्धेत पी.आर. जॅग्वार्सने व्ही.पी. पँथर्स संघाला पराभूत करत चषकावर नाव कोरले. टीडब्ल्यूपीएलचा अंतिम सामना व्ही.पी. पँथर्स विरुद्ध पी.आर. जॅग्वार्स या दोन संघात रंगला. पी.आर. जॅग्वार्ससाठी प्रथम फलंदाजी करत ५ गडी बाद ६७ धावा केल्या. मात्र लक्ष्याचा पाठलाग करताना व्ही.पी. पँथर्स ने ५ गडी बाद ५९ धावा केल्या. पी.आर. जॅग्वार्स संघाने हा अंतिम सामना ८ धावांनी जिंकला. सामनावीर म्हणून विक्रम विश्वकर्मा (पी.आर. जॅग्वार्स) तर इंडिया आयकॉन मॅन ऑफ द सिरीज विवेक शेलार, ठाणे आयकॉन मॅन ऑफ द सिरीज जुगेश यादव यांचा सन्मान करण्यात आला. पारितोषिक वितरण समारंभाला खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के उपस्थित होते. यावेळी शिवसेनेच्या महिला संघटक मीनाक्षी शिंदे, शिवसेना गटनेते पवन कदम, नगरसेवक मंदार केणी, युवासेना कार्यकारिणी सदस्य अर्जुन डाभी, नितीन लांडगे, मिलिंद चव्हाण, किरण जाधव, नितेश पाटोळे, पी. आर. जग्वार्स संघाचे मालक रोहित पिंपळकर, प्रकाश कोटवानी, व्ही पी पँथर्स संघाचे मालक विशाल जाधव, ठाणे वॉर्ड क्रिकेट कमिटीचे अध्यक्ष निखिल बुडजडे, उपाध्यक्ष अभिजित पवार यांच्यासह स्थानिक पदाधिकारी कार्यकर्ते आणि मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# ‘झिरो ब्युरोक्रसी’कडे शासनाची वाटचाल; प्रशासनाने ‘स्टार्टअप’सारखे काम करावे — मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## नागरी सेवा दिन आणि राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान' अंतर्गत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण







**मुंबई :** राज्यातील प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी ‘झिरो ब्युरोक्रसी’ची संकल्पना राबविण्याचा निर्धार व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाने ‘स्टार्टअप’प्रमाणे कार्य करण्याची गरज व्यक्त केली. सुलभ प्रक्रिया, पूर्वानुमेय आणि मानवी हस्तक्षेप कमी करून पात्र नागरिकांना थेट सेवा देणे हेच ‘झिरो ब्युरोक्रसी’चे मूळ तत्त्व असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

नागरी सेवा दिन 2026 आणि ‘राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा 2025-26’ अंतर्गत पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. या सभारंभास कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकजकुमार तसेच पुरस्कारार्थी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासनातील नाविन्यपूर्ण उपक्रमांची ‘स्टार्टअप’शी तुलना करत, प्रत्येक विभागाने स्वतःकडे एक स्वतंत्र स्टार्टअप म्हणून पाहिले पाहिजे, असे सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, झिरो ब्युरोक्रसी म्हणजे अधिकारी नसणे नव्हे, तर प्रक्रियांची पुनर्रचना (री-इंजिनिअरिंग) करून त्या अधिक सुलभ आणि पारदर्शक करणे होय. कोणत्याही व्यक्तीच्या पसंती-अपसंतीवर सेवा अवलंबून न राहता, पात्रतेनुसार सेवा मिळाली पाहिजे. या शासनाने 100 दिवस आणि 150 दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत प्रशासनातील कार्यक्षमता वाढवण्यावर भर दिला असून, त्यातील 85 टक्के उद्दिष्टे पूर्ण करण्यात यश आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून ‘इज ऑफ डुइंग बिझनेस’ सुधारण्यासाठी विविध प्रक्रियांचे सुलभीकरण करण्यात आले आहे.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी ‘विकसित महाराष्ट्र 2047’चा आराखडा मांडताना 2029, 2035 आणि 2047 हे तीन टप्पे निश्चित केल्याचे सांगितले. “महाराष्ट्र आता देशांतर्गत नव्हे तर जागतिक पातळीवर स्पर्धा करत आहे. राज्याची अर्थव्यवस्था जगातील 30व्या क्रमांकावर असून, आगामी काळात ती आणखी बळकट होईल,” असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रशासनातील सेवा वितरण सुधारण्यासाठी 20 महत्त्वाच्या सेवांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून, ‘आपले सरकार 2.0’च्या माध्यमातून नागरिकांना अधिक सुलभ सेवा देण्याची तयारी सुरू असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रशासनातील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्या कामाकडे ‘स्टार्टअप’च्या दृष्टिकोनातून पाहिल्यास नावीन्य, कार्यक्षमता आणि वेग यांचा संगम साधता येईल. अशा उपक्रमांमुळेच प्रशासन ‘झिरो ब्युरोक्रसी’कडे वाटचाल करू शकते.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी नाविन्यपूर्ण आणि परिवर्तनशील कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव करून “प्रशासनातील कल्पकता आणि नव्या कल्पनांची अंमलबजावणी हीच भविष्यातील बदलाची दिशा ठरेल,” असे सांगत त्यांनी सर्व पुरस्कारार्थ्यांचे अभिनंदन केले.

**नागरिकांना अधिक कार्यक्षम सेवा देणे हीच जबाबदारी — मुख्य सचिव राजेश अग्रवाल**

केंद्र व राज्य शासनाकडून जुने कायदे रद्द करणे, आवश्यक तेथे नवीन कायदे आणणे, तसेच विकेंद्रीकरणावर भर देणे या माध्यमातून नागरिकांना सुलभ सेवा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. “कमी नोकरशाही आणि अधिक कार्यक्षम सेवा हीच आपली जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी राज्यातील प्रशासनिक सुधारणांबाबत बोलताना केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ‘गती आणि संवेदनशीलता’ या तत्त्वांवर प्रशासन कार्यरत असल्याचे सांगत मुख्य सचिव अग्रवाल यांनी पायाभूत सुविधा विकास आणि नागरी सेवा सुधारणा या दोन्ही गोष्टी समांतरपणे राबवल्या जात असल्याचे नमूद केले.

राज्य शासनाच्या 100 आणि 150 दिवसांच्या कार्यक्रमांत टॉप-ड्रिव्हन पद्धतीने उद्दिष्टे निश्चित करून त्याचे मूल्यांकन करण्यात आले असून, अधिकाऱ्यांनी त्यात उल्लेखनीय कामगिरी केल्याचे अग्रवाल यांनी सांगितले. तसेच ‘विकसित महाराष्ट्र 2047’ या उपक्रमांतर्गत 2029 पर्यंतची ठोस उद्दिष्टे निश्चित करण्यात आली असून, सर्व विभागांनी महत्त्वाकांक्षी आणि वास्तववादी योजना तयार केल्या असल्याची माहिती त्यांनी दिली.

‘राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान (प्रगती)’ या उपक्रमाचा उल्लेख करताना मुख्य सचिव अग्रवाल यांनी सांगितले की, या माध्यमातून क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांच्या नवकल्पना आणि स्वतंत्र विचारांना प्रोत्साहन दिले जात आहे. कोतवाल, शिक्षक तसेच आयएएस अधिकाऱ्यांच्या सादरीकरणांचा विशेष उल्लेख करत त्यांनी प्रशासनातील सर्व स्तरांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचेही सांगितले.

या पुरस्कार समारंभाचे प्रास्ताविक सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकजकुमार यांनी केले तर यशदाचे महासंचालक सुहास दिवसे यांनी आभार मानले.

**प्रशासकीय गतिमानता आणि नाविन्यपूर्ण उपक्रम पुरस्कार**

मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून येणारे प्रस्ताव अंतर्गत ‘ड्रोन आधारित देखरेख आणि डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रणा’ यासाठी सचिव (कृषी व पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांना पहिले पारितोषिक देण्यात आले. या प्रस्तावाची मूळ कल्पना साप्रविचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे यांची आहे. याच अंतर्गत ‘कार्यालयीन कामकाज सुधारणे’साठी मराठी भाषा सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांना द्वितीय क्रमांकाने गौरविण्यात आले.

राज्यातील सर्व मुख्यालयाच्या कार्यालयातून येणाऱ्या प्रस्तावामध्ये ‘शाश्वत मत्स्यव्यवसायाच्या विकासाकरिता व मत्स्यसंपदेचे संरक्षण/संवर्धन करण्याकरिता प्रस्तावित संयुक्त सागरी मत्स्यव्यवस्थापन’ साठी आयुक्त प्रेरणा देशभ्रतार आणि प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे यांना प्रथम पारितोषिकाने गौरविण्यात आले. झोपडपट्टीधारकांशी उत्तम संवादासाठी आणि त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर या प्रस्तावांतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी (एसआरए) डॉ. महेंद्र कल्याणकर यांना द्वितीय क्रमांकांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.

विभागीय स्तरावरील निवड समित्यांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांतर्गत वनसंपदा, आयएफआर डॅशबोर्डकरिता आदिवासी विकास विभाग, तळोदाचे प्रकल्प अधिकारी अनय नवांदन यांना प्रथम, विविध योजनाकरिता जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल आणि करिश्मा नायर यांना द्वितीय पुरस्कार तर खत उपलब्धता पोर्टल (वाशिम) करिता कृषी विकास अधिकारी अभिजीत देवगिरकर यांना तृतीय पारितोषिक देण्यात आले.

महानगरपालिका स्तरावरून थेट प्रस्तावअंतर्गत कूल रुफकरिता आयुक्त सौम्या शर्मा आणि अमरावती मनपा आयुक्त वर्षा लढ्ढा यांना प्रथम, मनपा सेवा व्हॉट्सॲप व चॅटबॉटसाठी आयुक्त अमोल येडगे आणि आयुक्त जी. श्रीकांत यांना द्वितीय आणि ई-गव्हर्नन्सकरिता मीरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त राधाविनोद शर्मा यांना तृतीय पुरस्कार देण्यात आला.

सर्वोत्कृष्ट कल्पना/उपक्रम अंतर्गत शासकीय संस्थेसाठी सिकलसेल ॲनिमिया एलिमिनेशन मिशन 2025 (नंदुरबार) या प्रस्तावासाठी जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी आणि डॉ. वैभव सबनीस यांना प्रथम पुरस्कार, थ्रेड्स ऑफ चेंज (नवी मुंबई महानगरपालिका) साठी उपायुक्त स्मिता काळे यांना द्वितीय आणि बिंदू नामावली सॉफ्टवेअर (विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती) सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांना तृतीय पारितोषिक देण्यात आले.

सर्वोत्कृष्ट कल्पना/उपक्रमांर्तगत शासकीय अधिकारी या गटात ‘आम्हाला खेळू द्या’ या प्रस्तावासाठी छत्रपती संभाजीनगर मनपाचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांना प्रथम पुरस्कार तर ई-महसूल प्रणाली माहिती पुस्तिका (बुलढाणा) या प्रस्तावाकरिता उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड आणि सुजान सोळंके यांना द्वितीय पुरस्कार देण्यात आला.

सर्वोत्कृष्ट कल्पना/उपक्रमांर्तगत शासकीय कर्मचारी या गटात गव्हर्नमेंट ॲसेट मॅपिंग करिता महसूल सेवक, जिल्हाधिकारी कार्यालय अकोलाचे ऋषिकेश आंग्रे यांना प्रथम पुरस्कार, पाणंद रस्ता करिता कवठेमहांकाळ (जिल्हा सांगली)च्या मंडळ अधिकारी वैशाली शेंडगे-वाघमोडे यांना द्वितीय तर स्टेम एज्युकेशनसाठी जि. प. कन्या शाळा, अमरावतीचे सहशिक्षक वीरेंद्र ब्राम्हण यांना तृतीय पारितोषिक देण्यात आले.

# महिला सक्षमीकरण कृषी क्षेत्रातील महिला सक्षमीकरणाचे उमटले पाऊल तंत्रज्ञान व्यवस्थापक वैशाली भापसे यांची यशोगाथा



आजच्या प्रगत युगात महिला प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत असताना, कल्याण तालुक्यात कृषी क्षेत्रात एक आश्वासक बदल घडत आहे. हा बदल घडवून आणण्यामागे ‘तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक’ श्रीम. वैशाली आसराजी भापसे यांची दूरदृष्टी आणि तांत्रिक कौशल्य कारणीभूत आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या महिला सक्षमीकरण मोहिमेला खऱ्या अर्थाने मूर्त रूप देत, वैशालीजींनी आपल्या कृषी अभियांत्रिकीमधील उच्च शिक्षणाचा उपयोग थेट शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी केला आहे. बी.टेक आणि एम.टेक (कृषी अभियांत्रिकी) अशा भक्कम शैक्षणिक पार्श्वभूमीमुळे त्यांना शेतीतील तांत्रिक आणि वैज्ञानिक पैलूंची सखोल जाण आहे. लहानपणापासून कुटुंबाचा शेतीशी असलेला जवळचा संबंध आणि बळीराजाची आव्हाने प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे, त्यांच्या मनात शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली आणि याच प्रेरणेतून त्यांनी शासकीय सेवेत प्रवेश करून कृषी विकासाचे ध्येय स्वीकारले.

तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक म्हणून काम करताना वैशाली भापसे यांनी केवळ प्रशासकीय जबाबदारी पार न पाडता, नाविन्यपूर्ण संकल्पना राबवण्यावर भर दिला आहे. ‘आत्मा’ (ATMA) योजनेअंतर्गत त्यांनी तालुक्यात १३८ शेतकरी गटांची भक्कल बांधणी केली असून, या गटांना केवळ तांत्रिक मार्गदर्शनच नाही तर संघटन कौशल्य आणि व्यवसायाभिमुख दृष्टिकोन मिळवून दिला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबवल्या गेलेल्या शेतीशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि अभ्यास दौऱ्यांच्या माध्यमातून १००० हून अधिक शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीचे धडे गिरवले आहेत. विशेषतः नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीचा प्रचार करून त्यांनी पर्यावरणपूरक शेतीची एक नवी चळवळ उभी केली आहे. त्यांच्या प्रयत्नांतून ‘गोरजेश्वर’ आणि ‘ग्रीन डायमंड’ सारख्या शेतकरी उत्पादक कंपन्यांची यशस्वी स्थापना झाली असून, ‘स्मार्ट’ प्रकल्पांतर्गत शाश्वत शेती व्यवस्थापन आणि ‘थेट ग्राहक विक्री’ या संकल्पना प्रत्यक्षात उतरल्या आहेत. यामुळे मध्यस्थांची साखळी मोडीत निघून शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य भाव मिळत आहे.

नाविन्यपूर्ण प्रयोगांची आवड असलेल्या वैशालीजींनी तालुक्यात ‘सुरण’ (Elephant Foot Yam) लागवडीसारखे नवे प्रयोग यशस्वी करून शेतकऱ्यांसमोर उत्पन्नाचे एक उत्तम मॉडेल उभे केले आहे. शेतीसोबतच शेतीपूरक उद्योगांना चालना देण्यासाठी त्यांनी ‘पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया’ (PMFME) योजनेअंतर्गत टास्क फोर्समध्ये राहून केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. मुंबई, ठाणे आणि उपनगर क्षेत्रातील महिला बचत गट व नवउद्योजकांना प्रकल्प अहवाल तयार करणे, बँकिंग प्रक्रिया पूर्ण करणे आणि शासनाचे अनुदान मिळवून देणे या सर्व बाबींत त्यांनी मोलाची मदत केली. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे 100 पेक्षा अधिक अन्नप्रक्रिया प्रकल्पांना मंजुरी मिळाली असून, स्थानिक ब्रँडिंग आणि पॅकेजिंगच्या मदतीने ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती झाली आहे. वैशाली भापसे यांच्या या यशस्वी प्रवासात त्यांना प्रकल्प संचालक श्री. रामेश्वर पाचे, प्रकल्प उपसंचालक श्रीमती मनाली तांबडे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे भक्कम पाठबळ लाभले आहे. तंत्रज्ञानाची जोड आणि संवेदनशील मनाची साथ मिळाल्यास एक महिला कृषी क्षेत्रात कशी क्रांती घडवू शकते, याचे वैशाली भापसे या एक जिवंत उदाहरण बनल्या आहेत.

# पत्रकारिता क्षेत्रात एआय मुळे महत्त्वाचे बदल; बदलांकडे संधी म्हणून पाहत महिला पत्रकारांनी अधिक तंत्रस्नेही व्हावे - प्रधान सचिव ब्रिजेश सिंह




**मुंबई :** वेगाने बदलणाऱ्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात पत्रकारिता क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान महत्त्वाचे बदल घडवत आहे. या बदलांकडे संधी म्हणून पाहत महिला पत्रकारांनी अधिक तंत्रस्नेही व्हावे. या तंत्रज्ञानाच्या उपयोगाने महिला पत्रकार पत्रकारितेच्या माध्यमातून सकारात्मक परिवर्तन घडवून आणू शकतात, असा विश्वास माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय महिला आयोग आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर सभागृह येथे आयोजित महिला, माध्यमे आणि तंत्रज्ञान या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारितेवरील त्याचा परिणाम' या विषयावर प्रधान सचिव ब्रिजेश सिंह बोलत होते.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, प्रख्यात लेखिका डॉ. रिचा सूद, नवी दिल्ली येथील वरिष्ठ पत्रकार डॉ. स्वाती गुप्ता उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान हे मानवीय संदर्भावर काम करते. त्यामुळे त्यामध्ये चूक असण्याची शक्यता असते. पत्रकारितेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करताना संदर्भ बिनचूक असतील याची खात्री करावी. महिला पत्रकार राजकीय, मनोरंजन क्षेत्रासह गुन्हेविषयक क्षेत्राचेही वार्तांकन करीत असतात. वार्तांकन करताना महिला पत्रकारांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान अत्यंत उपयोगाचे ठरू शकते.

**विश्लेषणात्मक आणि संशोधनात्मक कामांसाठी अधिक वेळ**

‘ए आय’ हे केवळ माहितीचे साधन नसून ते पत्रकारितेचा वेग वाढवणारे एक शक्तिशाली माध्यम आहे. माहितीचे संकलन, भाषांतर आणि विविध व्यासपीठांवर मांडणी करण्यासाठी एआयचा प्रभावी वापर करून कामाची गुणवत्ता सुधारता येते. एआयमुळे मानवी श्रमाची बचत होऊन पत्रकारितेतील विश्लेषणात्मक आणि संशोधनात्मक कामांसाठी अधिक वेळ मिळत असल्याचेही प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले. बदलत्या काळात समृद्ध पत्रकारिता आणि आघाडीवर राहण्यासाठी महिलांनी एआय टूल्सचा वापर करणे काळाची गरज आहे. एआयमुळे उपलब्ध होणाऱ्या नव्या संधींचा फायदा घेण्यासाठी महिला पत्रकारांनी तांत्रिक कौशल्यांत प्रगती करणे आवश्यक आहे. येणाऱ्या काळात तंत्रज्ञानाशी मैत्री करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याची संधी महिलांकडे असल्याचे सांगत ब्रिजेश सिंह यांनी राष्ट्रीय महिला आयोगाने महिला पत्रकारांसाठी एआय मधील कौशल्य प्रशिक्षण सुरू करण्याचे आवाहनही केले. इंग्रजी भाषेचा अडसर दूर करून प्रादेशिक भाषांमध्ये एआयचा वापर करणे आवश्यक आहे. सर्वम सारख्या 'इंडिक' एआय टूल्समुळे ग्रामीण भागातील बातम्या किंवा माहिती थेट संबंधित लोकांपर्यंत स्थानिक भाषेत पोहोचवणे आता सोपे होणार आहे. यामुळे भाषेची मर्यादा संपुष्टात येऊन माहिती सार्वत्रिक होईल आणि त्याचा लाभ स्थानिक स्तरावरील महिला पत्रकारांना होईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. कार्यशाळेदरम्यान माहिती व जनसंपर्क विभागात सुरू असलेल्या डिजिटल उपक्रमांची माहिती देत प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले, विभागात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगातून अचूक वृत्तांकन वेगाने वितरण करण्यात येत आहे. ‘एआय’च्या क्षेत्रात काम करताना नैतिक नियमावली महत्वाची आहे. अशी नियमावली युरोपात तयार करण्यात आली आहे. भारतातही अशा पद्धतीची नियमावली आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.